सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर सोमवार, दि. ०९ जून २०२५ वर्ष - तिसरे अंक ६८ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## मुंबई-मडगाव वंदे भारत एक्स्प्रेस १६ जूनपासून आठवड्यातून तीनच दिवस

रत्नागिरी: भारतीय रेल्वेने मुंबई-मडगाव वंदे भारत एक्स्प्रेसच्या (२२२२९/२२२३०) २०२५ च्या मान्सून कालावधीसाठी वेळापत्रकात बदल जाहीर केला आहे. कोकण रेल्वे मार्गावरील सुरक्षित प्रवासासाठी हे बदल १५ जून २०२५ ते २० ऑक्टोबर २०२५ या कालावधीत लागू राहणार आहेत. या कालावधीत ही गाडी सध्याच्या सहाऐवजी तीनच दिवस धावणार आहे.

कोकण रेल्वेचे पावसाळी वेळापत्रक १५ जूनपासून लागू होत असले तरी पावसाळी वेळापत्रकातील डाऊन वंदे भारत एक्स्प्रेसचीची फेरी १६ जून रोजी होणार असल्याने या दिवसापासून वंदे भारत एक्स्प्रेसला हा बदल लागू असेल.

मुंबई-मडगाव वंदे भारत




एक्स्प्रेस (२२२२९) मान्सून वेळापत्रक असे : मान्सून काळात ही गाडी सोमवार, बुधवार आणि शुक्रवार असे आठवड्यातून तीन दिवस धावणार आहे. सकाळी ५:२५ वाजता गाऊ मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सुटेल. दादर (सकाळी ०५:३४), ठाणे (सकाळी ०५:५४), पनवेल (०६:२७), खेड ( ०८:२६), रत्नागिरी (०९:५०), कणकवली (११:१२), थिवी (दुपारी १२:१८) येथे थांबून ही गाडी दुपारी एक वाजून दहा मिनिटांनी मडगाव येथे पोहोचेल. प्रस्थान मान्सून काळात प्रवासाचा वेळ साधारणतः १० तास ५ मिनिटे असेल.

परतीच्या प्रवासात ही गाडी दुपारी बारा वाजून वीस मिनिटांनी मडगाव येथून सुटेल. गाडी रत्नागिरीतून सायंकाळी पाच वाजता रवाना होईल. खेड येथे ते सायंकाळी सहा वाजून ४० मिनिटांनी सुटणार असून मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनस येथे रात्री १० वाजून २५ मिनिटांनी पोहोचेल. प्रवाशांनी प्रवासाला निघण्यापूर्वी भारतीय रेल्वेच्या अधिकृत वेबसाइट (.शर्पीिळी. ळपवळरपीरळश्र.सीं.ळप) किंवा छढएड पवर अद्ययावत वेळापत्रक तपासावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

### नारी शक्तीच्या कामगिरीने संपूर्ण देशाचा अभिमान वाढवला : पंतप्रधान

नवी दिल्ली, ८ जून : आपल्या माता-भगिनी-कन्यांनी प्रत्येक टप्प्यावर आव्हानांना सामोरं जावं लागणारा काळ पाहिला आहे. पण आज, त्या केवळ विकसित भारत घडवण्याच्या संकल्पात सक्रिय भागच घेत नाहीत, तर शिक्षणापासून उद्योजकतेपर्यंत प्रत्येक क्षेत्रात नवीन मानदंडही प्रस्थापित करत आहेत. मागील ११ वर्षांत, आपल्या नारी शक्तीच्या कामगिरीने संपूर्ण देशाचा अभिमान वाढवला आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. पंतप्रधानांनी एक्स या सामाजिक माध्यमांवरील पोस्ट मालिकेद्वारे टिप्पण केले आहे. मोदी यांनी गेल्या ११ वर्षात महिलांच्या नेतृत्वाखालील विकासावर सरकारचे लक्ष अधोरेखित करून विकसित भारताच्या प्रवासात महिलांनी बजावलेल्या परिवर्तनकारी भूमिकेवर प्रकाश टाकला आहे.

## दंगल सुरू झाल्यामुळे मणिपूरच्या पाच जिल्ह्यांत पाच दिवस इंटरनेट आणि मोबाईल नेटवर्क बंद

इंफाळ : राष्ट्रीय तपास संस्थेने अर्थात एनआयएने मैतेई ग्रुप आरंबाई टेंगोलच्या पाच जणांना अटक केली आहे. यातील एक स्थानिक स्वयंघोषीत कमांडर आहे. ही अटक होणार याचा अंदाज येताच मणिपूरच्या काही भागांमध्ये दंगल करायला सुरुवात झाली. पण सर्वत्र चोख बंदोबस्तामुळे आरोपींना पलायन करणे जमले नाही. अखेर रविवारी ८ जून २०२५ रोजी मध्यरात्री अडीचच्या सुमारास पाचही जणांना अटक करण्यात आली. या अटकेनंतर दंगल आणखी भडकली. दंगलीची तीव्रता वाढू नये म्हणून इंफाळ पश्चिम, इंफाळ पूर्व, थोबुल, बिशनपूर, काकचिंग या पाच जिल्ह्यांमध्ये पाच दिवस इंटरनेट आणि मोबाईल नेटवर्क बंद करण्यात आले आहे.



रात्री भडकलेल्या दंगलीचे पडसाद आंतरराष्ट्रीय सीमेजवळच्या मोरेह पर्यंत दिसून आले. हिंसा आणखी पसरू नये म्हणून सर्वत्र दंगल प्रभावीत सर्व भागांमध्ये संचारबंदी अर्थात कर्फ्यू लागू करण्यात आली आहे. संपूर्ण बिष्णुपुर जिल्ह्यातही संचारबंदी आहे. दंगल करणाऱ्यांनी अटकेतील पाच जणांच्या सुटकेची मागणी करत क्वाकीथेल आणि उरीपोक येथे रस्त्यांवर टायर आणि जुने फर्निचर जाळले. जमाव मोठा असल्याचा आणि वाढत असल्याचा अंदाज येताच सुरक्षा पथकाने हवेत गोळीबार केला. गर्दी हटत नसल्याचे बघून दंगल आटोक्यात आणण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विशिष्ट गोळ्यांचा वापर करण्याचा निर्णय झाला आणि जमावाच्या दिशेने गोळीबार करण्यात आला.

तेंगोपाल जिल्ह्यातील एका कुकी व्यक्तीच्या अटकेला विरोध करण्यासाठी स्थानिक मोरेहमध्ये रस्त्यांवर आले. पण सुरक्षा पथक घटनास्थळी तातडीने आल्यामुळे हिंसा टळली. आंदोलकांनी अटकेतील व्यक्तीच्या सुटकेची मागणी केली. यामुळे मोरेहमध्ये तणावपूर्ण शांतता आहे. भाजपा खासदार लीशेंबा सनाजाओबा यांनी नागरिकांना शांत रहाण्याचे तसेच कायदा - सुव्यवस्थेचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

## आसाममध्ये ३.३७ लाख नागरिकांना पुराचा तडाखा, २३ मृत्यू

दिसपूर, ०८ जून : आसामच्या १२ जिल्ह्यांमध्ये पुराता तडाखा बसला आहे. याठिकाणचे सुमारे ३.३७ लाख नागरिक अजूनही पुराच्या विळख्यात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी आज, रविवारी दिली.

आसाम सरकारच्या अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार आतापर्यंत पुर आणि भूस्खलनामुळे एकूण २३ जणांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये ६ जण भूस्खलनात मरण पावले आहेत. राज्यातील श्रीभूम सर्वाधिक पूरप्रभावित भाग असून, १.९३ लाखांहून अधिक लोक तिथे पुराच्या विळख्यात आहेत. इतर प्रभावित जिल्ह्यांमध्ये हैलाकांडी येथील ७३७२४ तर कछार येथील ५६३९८ नागरिकांना पुराचा फटका बसला आहे. राज्यात एकूण ३३७३५८ नागरिकांना पुराचा फटका बसला आहे. तर ४१ सर्कल व ९९९ गावे प्रभावित झाली आहेत. राज्यातील ३६ हजारांहून अधिक नागरिकांनी १३३ मदत छावण्यांमध्ये आश्रय घेतला आहे. तर ६८ मदत वितरण केंद्रांतून गरजूंना मदत पोहचवली जात आहे. राज्यात पुरामुळे १२६५९ हेक्टर शेतजमीन पाण्याखाली गेली आहे.

तर राज्याच्या २ जिल्ह्यांमध्ये शहरी पूरामुळे २८४ लोक प्रभावित आहेत. तसेच काझीरंगा नॅशनल पार्क व पोबितोरा वन्यजीव अभयारण्य अजूनही पाण्याखाली असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

ब्रह्मपुत्रा नदीसह प्रमुख नद्यांचा पूर सध्या ओसरत असला तरी काही नद्या अजूनही धोक्याच्या पातळीवर आहेत. धुब्री येथे ब्रह्मपुत्रा, धरमटुल येथे कोपिली, बीपी घाट येथे बराक, आणि श्रीभूमी येथे कुशियारा धोक्याच्या पातळीवर वाहत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

## पावसामुळे यंदा रानभाज्यांचे लवकर आगमन, ग्राहकांची मागणी

### जिल्ह्यातील अनेक बाजारात रानभाज्या विक्रीसाठी येण्यास सुरुवात

दिंडोरी: सुरगाणा, पेठ, दिंडोरी, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, कळवण या आदिवासी भागात पावसाळ्यात येणार्या रानभाज्यांचे यंदा लवकर आगमन झाले आहे. त्यामुळे ग्राहकांचाही या भाज्यांना चांगला प्रतिसाद मिळत आहे.



कोणत्याही प्रकारची नियोजित शेती किंवा निगा न राखता, रानावनात तसेच पायवाटात नैसर्गिकरित्या उगवणाऱ्या या भाज्यांमध्ये पोषकतत्त्वांचा मुबलक खजिना असल्याने आयुर्वेदात त्यांना वरचे स्थान आहे.

आदिवासी भागात पारंपरिक अन्न

जंगलात शेतांच्या बांधावर, माळरानात त्या आढळतात. यांत अनेक औषधी गुणधर्मही असतात. आदिवासी भागात त्या आवर्जून खाल्ल्या जातात. आदिवासी भागात शेवळा, वाघाटा, दिघडी आदींचा आजही पारंपरिक अन्न म्हणून वापर होतो. ऋतूनुसार त्यांना या भाज्या सहज उपलब्ध होत असून, जुन्या पिढीतील व्यक्तींना भाज्यांचे औषधी गुणधर्म माहीत आहे. नवीन पिढीतही हे ज्ञान कायम आहे. या वनस्पती त्यांच्या दैनंदिन जीवनातील एक अविभाज्य घटक बनल्या आहेत.

बाजारपेठेतून येणारा भाजीपाला विकत घेण्यापेक्षा जंगलात येणार्या रानभाज्या शोधण्यासाठी आदिवासी लोक आता भर देत आहेत. जिल्ह्यातील अनेक ठिकाणच्या बाजारात रानभाज्या विक्रीसाठी येण्यास सुरुवात झाली आहे.

शेवळा, चाई, कवळी, मोखा, इगळी, रुखाळू, तेरा, दिघडी, वाघाट, तरण, काटवल, माल कामोनी, पांढरा कुडा, कुळमुळी, केना, कोंबडा, तरोटा, पानवेल, काळा पेठारा, पांढरा पेठारा, बांबूवाष्टे, भराटी, मटारू, राजगिरा, रानआल, रानकोचई, रानमटाळू, वाघोटी, तांदुळजा, पाथरी, माठ, घोळ, टाकळा, सराटे ई रानभाज्यांचे प्रकार आढळून येतात.

रानभाज्या या जंगलात बिगरखतांच्या उगवत असल्याने या भाज्या खाल्ल्यास शरीरास उपयोगी पडणारे क्षारांचे प्रमाण म्हणजे प्रोटीन, कॅल्शिअम, टाइप टू न्यू ट्रेन जास्त असतात. त्यामुळे आम्ही नागरिकांना पावसाळ्यात रानभाज्या खाण्याचे आवाहन आवर्जून करतो, असे डॉ. दिलीप रणवीर, तालुका वैद्यकीय अधिकारी, सुरगाणा यांनी सांगितले.

## विठ्ठल-रुक्मिणीचे २७ जूनपासून मिळणार २४ तास दर्शन

सोलापूर : आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येतात. या आषाढी यात्रा कालावधीत येणार्या भाविकांना मंदिर समितीमार्फत मुबलक सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. तसेच भाविकांचे सुलभ व जलद दर्शन व्हावे, यासाठी दि. २७ जूनपासून २४ तास दर्शन व्यवस्था उपलब्ध होणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष



गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. आषाढी यात्रेच्या अनुषंगाने मंदिर समितीची बैठक सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्तनिवास येथे संपन्न झाली. या बैठकीस मंदिर समितीचे सदस्य शकुंतलाताई नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, भास्करगिरी बाबा, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख-जळगावकर, माधवी निगडे, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा तसेच पुरातत्त्व विभागाचे रामेश्वर निपाणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्रीनिवास गुजरे, वास्तुविशारद तेजस्विनी आफळे, जतन व संवर्धनाचे ठेकेदार उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराज सर्किट विशेष ट्रेनचा आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

### छत्रपती शिवाजी महाराज सर्किट अंतर्गत भारत गौरव ट्रेनला मुंबईत हिरवा झेंडा

मुंबई: महाराष्ट्र शासन आणि भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाने (खठउढउ), आपल्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी तसेच = छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनगौरवाचा अनुभव देण्यासाठी एक विशेष पर्यटक ट्रेन 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किटची घोषणा केली आहे. ही भारत गौरव टुरिस्ट ट्रेन (इहरीीं ॠरीीं ढेीीळीीं ढीरळप) दि.०९ जून २०२५ पासून सुरू होत आहे. छत्रपती शिवाजी महाराज सर्किट अंतर्गत भारत गौरव ट्रेनला ९ जून रोजी सकाळी ६.०० वा. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल, प्लॅटफॉर्म क्रमांक १८, मुंबई येथे हिरवा झेंडा दाखवून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ होणार आहे. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री, अजित पवार, पर्यटन मंत्री शंभुराज देसाई व पर्यटन राज्यमंत्री इंद्रनिल नाईक




यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे.

या ५ दिवसांच्या विशेष टूरमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळांना भेट, इतिहासावर आधारीत कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत तरी पर्यटकांनी याचा अनुभव घ्यावा असे आवाहन पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी केले आहे.

पर्यटकांची चांगली पसंती

भारतीय रेल्वे विभाग आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ महाराष्ट्र शासनाशी समन्वय साधून, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे या गौरवशाली ट्रेनचे हे आगमन महाराष्ट्राच्या संस्कृतीचे भव्य दर्शन घडवणारे ठरेल. भारत गौरव ट्रेन ज्या-ज्या ठिकाणी पोहोचेल, त्या ठिकाणी असलेल्या पर्यटन स्थळांची सविस्तर माहीती पर्यटकांना देण्यात येणार आहे. दि.०९ जुन २०२५ रोजी पासून सुरु होणारी ट्रेन पुर्णतः आरक्षित झाली असून पर्यटकांची चांगली पसंती दिली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहासाच्या या सहलीमुळे महाराष्ट्राच्या पर्यटनाला एक वेगळा आयाम मिळणार आहे. या उत्साही यात्रेत सहभागी होऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वसा उचलावा, आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगावा, आणि नव्या पिढीला या इतिहासाचे दर्शन घडवावे, असे आवाहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सूर्यवंशी यांनी केले आहे. या उपक्रमासाठी महामंडळाचे सर्व अधिकारी समन्वय आणि परीश्रम करीत असून, छत्रपती शिवाजी महाराजांचे गडकिल्ले, महाराष्ट्राची समृद्ध परंपरा आणि लोकसंस्कृती सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी

### लाडक्या बहिणींचा दादा भुसे यांच्या घरावर मोर्चा

मनमाड, ८ जून - शालेय पोषण आहार शिजवणाऱ्या महिलांना किमान वेतन वाढ करण्यात यावी त्यांना विमा संरक्षण देण्यासाठी यावे कायमस्वरूपी नोकरीत समाविष्ट करण्यात यावे वर्षाला दोन ड्रेस(साड्या ) देण्यात याव्या यासह वर्तमान कामगार संघटना अध्यक्ष शरद लोहकरे यांच्यावर शासनाच्या परिपत्रकात फेरबदल करून महिलांची अर्थिक फसवणूक केली म्हणून फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा यासह इतर रास्त मागण्यांसाठी आधारवड महिला बहुउद्देशी सेवाभावी संस्था आयटक व श्रमिक कामगार संघटना यांच्या वतीने आज शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या बंगल्यावर मोर्चा काढण्यात आला.

महात्मा फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मोर्चाला सुरवात करण्यात आली पोलिसांनी मध्यस्ती करत हा मोर्चा बंगल्यावर न नेता भुसे यांच्या संपर्क कार्यालयावर नेला याठिकाणी भुसे यांनी महिलांशी सविस्तर चर्चा करून निवेदन स्वीकारले व याबाबत मी तात्काळ निर्णय घेतो असे आश्वासन दिले.

## सर्व शासकीय कार्यालयात सौर ऊर्जेचा वापर सुरू करणार - मुख्यमंत्री

पुणे, ८ जून : राज्यातील सर्व शासकीय कार्यालयात डिसेंबर २०२५ पर्यंत सौर ऊर्जेचा वापर सुरू करणार असून प्रधानमंत्री सूर्य घर योजना राज्यात प्रभावीपणे राबविणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महाऊर्जाच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या उद्धाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, खासदार मेधा कुलकर्णी, खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे , आमदार भीमराव तापकीर, महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, महाऊर्जाच्या महासंचालक डॉ. कादंबरी बलकवडे, महाराष्ट्र राज्य वीज कंपनीचे संचालक विश्वास पाठक, ऊर्जा दक्षता ब्युरोचे सचिव मिलिंद देवरे, अतिरिक्त महासंचालक डॉ. त्रिगुण कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाऊर्जासाठी येत्या काळात दोन उद्दीष्टे महत्वाची आहेत. सर्व शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जेचा वापर करण्याला गती द्यावी लागेल. प्रधानमंत्री सुर्यघर योजना यशस्वी योजना असून त्या योजनेशी संलग्न असलेली राज्याची योजना सुरू करून पहिल्या टप्प्यात १०० युनिटपर्यंतचे सर्व ग्राहक आणि दुसऱ्या टप्प्यात ३०० युनिटपर्यंतचे सर्व ग्राहक सौर ऊर्जेवर आणायचे आहेत. ३०० युनिटपर्यंत वीजेचा वापर करणाऱ्या ग्राहकांचे वीजचे देयक शून्यावर यावे असा प्रयत्न आहे. ही दोन्ही उद्दीष्टे पूर्ण करण्यासंदर्भात महाऊर्जा हे काम चांगल्यारितीने करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अपारंपरिक क्षेत्रात महाराष्ट्राची भरारी

मुख्यमंत्री मंत्री पुढे म्हणाले, हरित इमारतीसाठी असलेली सर्व मानके पूर्ण करणारी, निसर्गाचा पूर्णपणे उपयोग करणारी, ऊर्जेची बचत करणारी आणि आवश्यक असणारी ऊर्जा १०० टक्के निर्माण करणारी महाऊर्जाची ही नवी इमारत हरित इमारतीचा उत्तम नमुना आहे. ऊर्जा बचतीच्या क्षेत्रात आणि अपारंपरिक ऊर्जेच्या क्षेत्रात, महाराष्ट्राने चांगली कामगिरी केली आहे. गेल्या २ वर्षात देशभरात ४ लाख कृषी पंप बसाविण्यात आले असतांना राज्याने अपारंपरिक ऊर्जेच्या वापरला प्रोत्साहन देत ५ लाख सौर कृषीपंप बसविले. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनीच्या माध्यमातून १६ हजार मेगा वॉट क्षमतेचे फिडर २०२६ पर्यंत सौर ऊर्जेवर परिवर्तीत करण्यात येणार आहेत. त्याचे काम अत्यंत वेगाने सुरू आहे. विभाजीत पद्धतीने असलेला, आशियातील हा सर्वात मोठा प्रकल्प आहे. एकूणच सौर, पवन आणि हायड्रोजन क्षेत्रातही राज्याने भरारी घेतली असल्याचे फडणवीस म्हणाले. महाऊर्जाने गेल्या काही वर्षात अपारंपरिक ऊर्जा निर्माण करण्यात चांगली कामगिरी केली आहे. सौर ऊर्जेच्या निर्मितीत देशात आपण अग्रेसर आहोत. विभाजीत पद्धतीने सौर ऊर्जेवर वीज निर्माण करूनही देशात आपण महत्वाचे स्थान मिळविले आहे.

## दुबई : स्कूबा डायव्हिंग दरम्यान एका भारतीय तरुणाचा मृत्यू

अबू धाबी , ८ जून : दुबईतील जुमेराह समुद्र किनारी स्कूबा डायव्हिंग दरम्यान हृदयविकाराचा झटका आल्याने एका भारतीय इंजिनिअर तरुणाचा मृत्यू झाला आहे. इसाक पॉल ओलाक्केनगिल (वय २९) असे या तरुणाचे नावं असून तो मूळचा केरळ येथील आहे.

मीडिया रिपोर्टनुसार, ओलाक्केनगिल हे त्यांच्या कुटुंबासह सुट्ट्यांचा आनंद घेण्यासाठी केरळला गेले होते. त्यांची पत्नी रेशम आणि धाकटा भाऊ इविन यांच्यासोबत सुट्टीचा आनंद घेण्यासाठी जुमेराह समुद्र किनारी गेले होते. यावेळी त्यांनी स्कूबा डायव्हिंग करण्याचा निर्णय घेतला. पाण्याखाली श्वास घेण्यास त्रास होत असल्याने ओलाक्केनगिल यांना त्यांना पाण्याखाली हृदयविकाराचा झटका आला. त्यांना तत्काळ समुद्र किनार्यावर आणण्यात आले. त्यांना रुणालयात दाखल करण्यता आले मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले, अशी माहिती ओलाक्केनगिल यांचे काका डेव्हिड प्यारीलोस यांनी दिली.

ओलाक्केनगिल याचा भाऊ इव्हिन याला या घटनेचा मोठा मानसिक धक्का बसला आहे. त्यालाही रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दुबईच्या कायदा अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी स्कूबा डायव्हिंग सत्रादरम्यान वापरलेली उपकरणे त्याचे विश्लेषण करण्यासाठी जप्त केली आहेत. आवश्यक कायदेशीर कागदपत्रे मिळाल्यानंतर श्री ओलाकेंगिल यांचे मृतदेह भारतात परत पाठवले जाईल, असे दुबईतील अधिकार्यांनी स्पष्ट केले आहे.

### चेंगराचेंगरी: मृतांच्या कुटुंबियांना २५ लाखांची मदत जाहीर

बंगळूरू , ८ जून - रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विजयानंतर बंगळुरूमधील एम. चिन्नास्वामी स्टेडियम बाहेर झालेल्या दुःखद घटनेनंतर कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी मोठी घोषणा केली आहे.आता चेंगराचेंगरीच्या घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना २५ लाख रुपयांची भरपाई रक्कम देण्याचे आदेश मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी दिले आहेत. यापूर्वी पीडितांना १० लाख रुपये देण्याची घोषणा करण्यात आली होती.

## देशभरात कोरोनाचे ६,१३३ रुग्ण

नवी दिल्ली: देशात पुन्हा एकदा कोरोनाच्या रुग्णसंख्येत वाढ होऊ लागली आहे. यामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सध्या देशभरात कोरोना विषाणूचे ६,१३३ सक्रिय रुग्ण असून, ६,२३७ रुग्णांनी संसर्गावर मात केली आहे. तसेच गेल्या २४ तासांत देशात ६ जणांचा कोविड-१९ विषाणूच्या संसर्गाने मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे. सध्या कोरोनाने मृत्युमुखी पडणाऱ्या लोकांची संख्या कमी जरी असली, तरी दिवसागणिक वाढणारे सक्रिय रुग्ण कोरोना महामारीबद्दल चिंता वाढवत आहेत. कोरोनाच्या वाढत्या प्रकरणांमुळे केंद्र सरकारने सर्व राज्यांना सतर्क राहण्यास, आणि आवश्यक उपाययोजना त्वरित राबवण्यास सांगितले आहे.

राष्ट्रीय राजधानी दिल्लीमध्येही कोरोनाचे प्रमाण वाढत असून ६६५ सक्रिय प्रकरणांची नोंद झाली आहे. तर, केरळमध्ये ३, कर्नाटकमध्ये २ आणि तामिळनाडूमध्ये १ रुग्णाचा मृत्यू झाला आहे. या मृतांमध्ये केरळमधील तिघांचे वय अनुक्रमे ५१, ६४ आणि ९२ वर्षे होते. कर्नाटकमधील दोन पुरुष रुग्ण ४६ आणि ७८ वर्षांचे, तर तामिळनाडूतील रुग्ण ४२ वर्षांचा होता. विशेष म्हणजे, गेल्या २४ तासांत मृत्युमुखी पडलेले सर्व रुग्ण पुरुष होते.

देशभरात एकूण ६१ मृत्यू

जानेवारी २०२५ पासून आतापर्यंत देशभरात कोरोनामुळे एकूण ६१ मृत्यू झाले आहेत. एकट्या दिल्लीमध्येच यावर्षी आतापर्यंत ७ जणांनी प्राण गमावले आहेत. रविवारी (दि.८) सकाळपर्यंत देशात ५,७५५ सक्रिय रुग्ण होते आणि ५,४८४ रुग्णांना रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली होती. कोरोनाचे हे पुन्हा डोके वर काढणे लक्षात घेता, केंद्र सरकारने सर्व राज्यांना सतर्क राहण्यास आणि कोविड व्यवस्थापनाच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना तत्काळ करण्याचे आदेश दिले आहेत. तज्ज्ञांच्या मते, यावेळी कोरोना फारसा धोकादायक नसला तरी वयस्कर, आजारी आणि लहान मुलांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. लसीकरण पूर्ण करणे, गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरणे आणि संसर्गाची लक्षणे आढळल्यास त्वरित चाचणी करणे ही मूलभूत खबरदारी महत्त्वाची आहे.

## अग्रलेख...

# जातनिहाय जनगणना; विकसित भारताचे नवनीत

बहुचर्चित जनगणनेसोबत जातनिहाय जनगणना देशात पुढील वर्षीपासून होणार आहे. त्यामुळे जनगणनेसोबत यावेळी प्रथमच जातनिहाय जनगणनेचाही मुहूर्त लागला असे म्हणायला हरकत नाही. जनगणना देशात दर १० वर्षांनी होत असते. याआधी २०११ मध्ये जनगणना झाली होती. त्यामुळे ती नियमाप्रमाणे २०२१ मध्ये व्हायला पाहिजे होती. पण त्यावेळी देशभर कोरोनाने थैमान घातले असल्यामुळे जनगणना होऊ शकली नव्हती. यावेळच्या जनगणनेचे वैशिष्ट्य म्हणजे जनगणनेसोबत जातनिहाय जनगणनाही केली जाणार आहे. अशी जनगणना देशात तब्बल ९६ वर्षांनी होत आहे. याआधी १९३१ मध्ये म्हणजे देशात ब्रिटिशांचे शासन असताना जातनिहाय जनगणना झाली होती.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर एकदाही जातनिहाय जनगणना झाली नाही. आतापर्यंतच्या देशातील एकाही सरकारने अशी जनगणना केली नाही. यामागे काही कारणे नक्कीच असावीत. काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जातनिहाय जनगणनेची मागणी गेल्या काही वर्षांपासून लावून धरली होती. यात देशातील उपेक्षित तसेच वंचित वर्गातील लोकांच्या कल्याणापेक्षा राहुल गांधी यांचा मोदी सरकारला अडचणीत आणण्याचा डाव होता, असे म्हणायला हरकत नाही. पण मोदी सरकारने जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेत काँग्रेसचा हा डाव त्यांच्यावरच उलटवून लावला. मात्र असे करताना मोदी सरकारचा उद्देश फक्त काँग्रेसला अडचणीत आणणे एवढाच नव्हता तर यातून सरकारला देशातील वंचित, पीडित, शोषित तसेच दलित वर्गातील लोकांच्या कल्याणाचा राजमार्ग प्रशस्त करणे हा सुद्धा होता आणि आहे. त्यामुळे आता राहुल गांधींना आणि काँग्रेसलाही कुठून आपण जातनिहाय जनगणनेची मागणी केली, असे झाले असेल. 'आ बैल मुझे मार' अशी काँग्रेसची स्थिती यामुळे झाली आहे. जनगणनेमुळे देशातील लोकसंख्या किती आहे, याचा अचूक आकडा समजतो. त्यामुळे देशाच्या विकासाचे सर्वांगीण धोरण आखता येते. २००१ च्या जनगणनेनुसार देशाची लोकसंख्या १०२ कोटी होती, २०११ मध्ये करण्यात आलेल्या जनगणनेनुसार ही लोकसंख्या १२१ कोटींवर गेली होती. आता १५ वर्षांनी होणाऱ्या जनगणनेने देशाची लोकसंख्या १५० कोटींचा आकडा ओलांडेल, असा अंदाज आहे. आतापर्यंत लोकसंख्येच्या बाबतीत चीन जगात सर्वांत समोर होता, तर भारत दुसऱ्या स्थानावर होता. ज्याप्रमाणे आपण अर्थव्यवस्थेच्या बाबतीत जपानला मागे टाकत जगात तिसरे स्थान मिळवले, तसेच लोकसंख्येच्या बाबतीतही चीनला मागे टाकत जगात अव्वल स्थान मिळवले आहे. ही तशी फारशी भूषणावह बाब म्हणता येणार नाही. यावर्षीच्या जनगणनेचे वेगळे महत्त्व आहे. यावेळी होणाऱ्या जनगणनेने लोकसभा तसेच विधानसभा मतदारसंघाची फेररचना होणार आहे, म्हणजे लोकसभा तसेच विधानसभेतील खासदार आणि आमदारांची संख्या वाढणार आहे. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मोदी सरकारने २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. त्यामुळे लोकसंख्येच्या अनुपातात लोकसभेत आणि राज्य विधानसभांत महिलांसाठी राखीव असलेल्या मतदारसंघांची संख्याही वाढणार आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपासून लोकसभेतील महिला खासदारांच्या संख्येत लक्षणीय वाढ होणार आहे. महिलांचा आवाज वाढणार आहे. लोकसभेची आजची सदस्यसंख्या ५४३ आहे. यानुसार लोकसभेतील महिला खासदारांची संख्या आताच १८१ व्हायला पाहिजे. सध्या ती ६० च्या वरही नाही.

जनगणनेने ज्याप्रमाणे लोकसंख्येचा अंदाज येतो, त्याप्रमाणे देशातील सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचेही आकलन होत असते. महिला किती, पुरुष किती यासोबत किती लोकसंख्या शिक्षित आहे, किती अशिक्षित आहे, त्यांचा आर्थिक स्तर काय आहे, याचाही अंदाज येतो. लहान मुलांची तसेच शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या संख्येचाही आढावा यातून घेतला जातो. याचा देशाचे शैक्षणिक धोरण ठरवताना उपयोग होतो. लोकांच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेताना दारिद्र्यरेषेखाली किती लोक आहेत, याचाही अंदाज देशाचे धोरण आखणाऱ्यांना भविष्यात त्यांच्या कल्याणाच्या योजना आखताना उपयोगी ठरतो. यावेळी जनगणनेच्या अर्जात अन्य माहितींसोबत जातीचा स्तंभही राहणार आहे. मात्र जातनिहाय जनगणना हे दुधारी शस्त्र आहे, याचा जसा फायदा होऊ शकतो, तसेच त्यामुळे नुकसानही होऊ शकते. यामुळे समाजातील 'आहे रे' आणि 'नाही रे' अशा दोन वर्गांत नवा संघर्ष सुरू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे जातनिहाय जनगणनेचा कोणत्याही राजकीय पक्षाने शस्त्र वा अस्त्र म्हणून आपल्या राजकीय फायद्यासाठी वापर न करता सामाजिक परिवर्तनाचे साधन म्हणून त्याकडे पाहिले पाहिजे, असे वाटते. पण आपल्या देशातील काही अपवाद वगळता अन्य राजकीय पक्ष मृतांच्या टाळूवरील लोणी खाण्यात नेहमीच कोणतीही कसर बाकी ठेवत नाही, गिधाडाप्रमाणे त्यावर तुटून पडतात. तसेच याहीवेळी झाले तर हिंदू आणि मुस्लिम संघर्षाप्रमाणे नवा संघर्ष देशात पेटण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे सर्व राजकीय पक्षांनी अतिशय संयमाने याकडे पाहण्याची गरज आहे. आरक्षण आणि अन्य सरकारी सुविधांचा लाभ त्या त्या वर्गातील काही मोजक्या जातींपुरताच मर्यादित राहिला. समाजातील दलित, शोषित, पीडित आणि वंचित वर्गातील ज्या लोकांना आरक्षण आणि अन्य सरकारी सुविधांचा लाभ मिळायला पाहिजे, त्यांना तो आतापर्यंत त्या प्रमाणात मिळाला नाही. जातनिहाय जनगणनेतून समाजातील अशा लोकांची वर्गवारी समोर येणार आहे. आर्टिफिशल इंटेलिजन्स (एआय) आणि विज्ञान तसेच तंत्रज्ञानाच्या अत्याधुनिक साहित्याचा वापर करत या वंचित वर्गासाठी आम्हाला विकासाचे नवे धोरण आखावे लागणार आहे. एआय हे अतिशय प्रभावी आणि उपयोगी असे साधन आज आमच्याजवळ आहे. त्याचा योग्य उपयोग आम्हाला करता येणार आहे. जातनिहाय जनगणनेच्या माहितीच्या अचूक विश्लेषणासाठी आम्हाला एआयचा वापर करता येईल आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच या विकासोत्सुक वर्गासाठी नवे धोरण आखता येईल. आतापर्यंत शेताच्या एखाद्या भागातील पिकांना कीड लागली असताना शेतकऱ्यांना सरसकट सगळ्या शेतात कीटकनाशकाची फवारणी करावी लागत होती. यामुळे शेतकऱ्यांचा वेळ तर जात होता, पण अनावश्यक आर्थिक भुर्दंडही त्यांच्यावर पडत होता. आता एआयचा वापर करून पिकाच्या जेवढ्या भागात कीड लागली, तेवढ्या भागातच कीटकनाशकाची फवारणी करून शेतातील उत्पादन शेतकरी वाढवू शकतो. हे उदाहरण यासाठी दिले की जातनिहाय जनगणनेतील माहितीचेही पृथक्करण आम्हाला याच पद्धतीने करावे लागणार आहे.

राजकीय पक्षांनी परिपक्वता दाखवली तर जातनिहाय जनगणना ही आमच्यासाठी ॲसेट ठरू शकते. समाजातील ज्या वर्गापर्यंत आतापर्यंत विकासाची फळे पोहोचली नाहीत, त्यांच्यापर्यंत विकासाची फळे या मार्गाने आम्ही पोहोचवू शकतो. २०४७ पर्यंत विकसित भारताचे जे स्वप्न आम्ही पाहिले आहे, त्याची पूर्तता याच मार्गाने आम्ही गेलो तर त्याच्याही कितीतरी आधी आम्हाला करता येणार आहे. गरज आहे, ती फक्त राजकीय पक्षांनी आपल्या राजकीय स्वार्थाकडे कानाडोळा करण्याची तसेच राजकीय नेत्यांनी आपल्या जिभेवर लगाम घालण्याची. असे केले तर जातनिहाय जनगणना ही विकासाचे नवे प्रारूप ठरवताना मार्गदर्शक ठरू शकते. मोदी सरकारने जातनिहाय जनगणना करताना त्यामुळे उद्भवणाऱ्या संभाव्य समस्यांतून कसा मार्ग काढायचा याचा विचार नक्कीच केला असेल. कारण मोदी सरकार राष्ट्रहिताचा कोणताही निर्णय घाईगडबडीत घेत नाही, तर पूर्ण विचारांती तसेच त्याच्या सर्व पैलूंचा अभ्यास करून घेत असते, असा आजपर्यंतचा इतिहास आणि जनतेचाही अनुभव आहे. त्यामुळे जातनिहाय जनगणनेच्या या मंथनातून जे नवनीत निघणार आहे, ते नव्या समृद्ध आणि विकसित भारताची मुहूर्तमेढ रोवणारी ठरेल, यात शंका नाही. ▮

## यंगिस्तान

# १०४ वर्षांच्या वृद्धाची निर्दोष मुक्तता?

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

मागच्या वर्षी भारताने न्यायदेवतेच्या पुतळ्यामध्ये (लेडी ऑफ जस्टिस) आमूलाग्र बदल केलेला आहे. आपल्याकडे अंधा कानून म्हणायची पद्धत होती. कायद्याने कधीकधी चुकीचा न्याय होतो, तर बऱ्याचदा न्याय व्हायला कित्येक वर्षे जातात, म्हणूनच अंधा कानून ही संकल्पना अस्तित्वात आली. मात्र लेडी ऑफ जस्टिसच्या डोळ्यांवरील पट्टी ही सर्वांकडे समान दृष्टीने पाहण्यासंबंधी आहे. आता आपण ही पट्टी काढून टाकलेली आहे. न्यायदेवतेच्या हातात तलवारऐवजी संविधान आलेले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या लायब्ररीत हा पुतळा बसवण्यात आला आहे. सेवानिवृत्त सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांच्या आदेशानुसार हा पुतळा बसवण्यात आला आहे. इंग्रजांची निशाणी काढून टाकण्याची ही भावना आहे. सरन्यायाधीशांनी याबाबत मत व्यक्त करताना म्हटले होते की ''कायदा हा आंधळा नसतो. तो सर्वांकडे समान दृष्टीने पाहतो. तलवार ही हिंसेचे प्रतीक आहे. हिंसेने न्याय देता येत नाही.'' पूर्वीचा न्यायदेवतेचा पुतळा रोमन-युनानी संस्कृतीतून इंग्रजांच्या मार्फत भारतात आला. इतकी वर्षे हा पुतळा आपण न्यायदेवता म्हणून सादर करत होतो. मात्र आता या पुतळ्याचे भारतीयीकरण झालेले आहे. न्यायदेवतेच्या पुतळ्याला साडी आहे. एक चांगला दृष्टिकोन ठेवून हा बदल आपण केलेला आहे. आता अपेक्षा आहे की यापुढे न्यायदेवता श्रीमंत-गरीब यात भेदभाव न करता योग्य आणि लवकर निर्णय देईल.

या गोष्टी आठवण्याचं कारण म्हणजे उत्तर प्रदेश येथील रहिवासी लखन लाल यांची ४३ वर्षांनी वयाच्या १०४ व्या वर्षी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. कौशंबी जिल्ह्यातील गौराए गाव येथे लखन लाल राहतात. १९७७ मध्ये हत्या आणि हत्येचा प्रयत्न या आरोपांखाली त्यांना अटक झाली होती. १९८२ पर्यंत त्यांनी कायदेशीर लढा दिला. जिल्हा आणि सत्र न्यायालय प्रयागराजने त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. लखन यांनी कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध अलाहाबाद उच्च न्यायालयात अपील केले आणि ४३ वर्षांनंतर त्यांच्या अपीलचा निर्णय त्यांच्या बाजूने आला आणि २ मे २०२५ रोजी त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. ४३ वर्षांआधी त्यांचं वय ६१ वर्षे असेल. ज्या वयात नातवंडांसोबत हसत-खेळत दिवस काढायचे अशा वयात त्यांना तुरुंगात जावं लागलं. त्यांना लाभलेलं दीर्घायुष्य हे त्यांच्यासाठी आणि आपल्या न्यायव्यवस्थेसाठी देखील दुर्दैव म्हणावं लागेल. त्यांचा वृद्धापकाळ तुरुंगात गेला हे त्यांचं दुर्दैव आणि ते जीवित राहिले म्हणून हा खटला सुरू राहिला



आणि त्यांची ४३ वर्षांनी निर्दोष मुक्तता झाली, यामुळे न्यायव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले हे न्यायव्यवस्थेचे दुर्दैव. तसं पाहता न्यायव्यवस्थेवर अनेकदा प्रश्नचिन्ह उभे राहिले आहेत. सर्वसामान्य माणसं सुरक्षेसाठी सरकारी यंत्रणा आणि न्यायासाठी न्यायव्यवस्थेवर अवलंबून राहतात. जर या दोन्ही घटकांकडून न्याय नाही मिळाला तर सामान्य माणसाने करायचं तरी काय, हा मोठा प्रश्न आहे.

एका आकडेवारीनुसार (आंतरजालावरील माहितीनुसार) भारतीय न्यायालयांमध्ये सध्या सुमारे ५.१ कोटी प्रकरणे प्रलंबित आहेत, ज्यामध्ये सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालये आणि जिल्हा व सत्र न्यायालयांचा समावेश आहे. सर्वोच्च न्यायालयात सध्या सुमारे ८३,००० प्रकरणे प्रलंबित आहेत. यामध्ये प्रामुख्याने घटनात्मक खटले, नागरी (सिव्हिल), फौजदारी (क्रिमिनल), आणि विशेष अनुमती याचिका यांचा समावेश आहे. उच्च न्यायालयांत सुमारे ५९ लाख प्रकरणे प्रलंबित आहेत. यामध्ये नागरी म्हणजे जमीन, मालमत्ता, कुटुंब खटले, फौजदारी, कर-संबंधित खटले, आणि घटनात्मक बाबी यांचा समावेश आहे. तर जिल्हा व सत्र न्यायालयांमध्ये सुमारे ४.५ कोटी प्रकरणे प्रलंबित आहेत. यामध्ये फौजदारी खटले, नागरी खटले आणि कौटुंबिक खटले यांचा समावेश आहे.

आकडेवारीनुसार, भारतात सध्या प्रति १० लाख लोकसंख्येमागे फक्त २१ न्यायाधीश आहेत. त्यामुळे न्याय लवकर मिळण्याची अपेक्षा कशी करता येईल? तसेच ''तारीख पे तारीख'' ही संस्कृती अजूनही बळकट आहे. यात आणखी एक घटक कारणीभूत आहे, लोकांमध्ये कायदेशीर हक्कांबाबत जागरूकता वाढत असल्यामुळे खटल्यांचे प्रमाणही वाढले आहे. न्यायालयीन कर्मचारी, डिजिटलायझेशन आणि संसाधनांच्या कमतरतेमुळे देखील विलंब होतो. आपण कितीही म्हटलं की कायदा सर्वांसाठी समान आहे. परंतु कायदा राबवणारे सर्वांसाठी समान आहेत का? हा मूळ प्रश्न आहे. बऱ्याचदा आपल्या समोरच गुन्हे घडतात, उघडपणे घडतात आणि गुन्हेगारही उघडपणे फिरतात, तेव्हा खरोखरंच आपण लोकशाही व्यवस्था पूर्णपणे स्वीकारली आहे का, हा प्रश्न मनात घोळत राहतो. गल्लीछाप गुंडांच्या पाठी बऱ्याचदा स्थानिक राजकीय नेत्यांचा हात असतो. म्हणून त्यांना गुन्हा करायला प्रोत्साहन मिळतं. अनेकदा स्थानिक राजकीय नेते हेच गुन्हेगार असतात. वैष्णवी हगवणे आणि सरपंच देशमुख हत्याकांड प्रकरणात ही गोष्ट प्रामुख्याने जाणवते. फार दूर का जायचं? अनंत करमुसे या सुशिक्षित तरुणाचे अपहरण करून अमानुष मारहाण करणारी व्यक्ती मंत्रिमंडळात सन्मानाने बसते, आमदार म्हणून मिरवते आणि वर संविधानाचे रक्षण करत असल्याचा आव आणते. तेव्हा आपल्याला प्रश्न पडतो की कायद्याने सर्वसामान्य माणसाला न्याय मिळतो का?

आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की लोकशाही ही सर्वसामान्य माणसाच्या संयमावर टिकून आहे. गोदामाच्या बाहेर १० दिवस उपाशी उभा असलेल्या पहारेकऱ्याची भूक कधी ना कधी अनावर होईल... तसंच न्यायावर अवलंबून तिष्ठत उभा असणाऱ्या सामान्य माणसाचा बांध कधी ना कधी फुटेल. आपल्याला लोकशाही सुरक्षित ठेवायची असेल तर गुंड संस्कृती आणि गुंडांना शरण देणारी राजकीय संस्कृती नष्ट करावी लागणार आहे. तसेच आपण आता न्यायदेवतेच्या पुतळ्यामध्ये आमूलाग्र बदल केला आहे त्याचप्रमाणे न्यायदान देणाऱ्यांच्या पद्धतीतही आमूलाग्र बदल करावा लागणार आहे. दिल्लीतील न्यायमूर्तींच्या घरात जळलेल्या चलनी नोटा सापडल्या याकडेही न्यायव्यवस्थेचं लक्ष वेधावं लागणार आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून ७० वर्षांत दुर्जनांची इको-सिस्टिम तयार झाली आहे. ही इको-सिस्टिम मोडून काढायला कदाचित आणखी ७० वर्षे लागतील. याची सुरुवात न्यायव्यवस्थेपासून केल्यास लोकशाही शाबूत राहण्यास मदत होईल. १०४ वर्षांच्या वृद्धाची ४३ वर्षांनंतर निर्दोष मुक्तता झाली, हा त्यांच्या कुटुंबासाठी आनंदाचा क्षण असेल, परंतु भारतीय न्यायव्यवस्थेसाठी हा आरसा दाखवणारा क्षण आहे! ▮

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**अनिल फेकरीकर**

# आता माणसाची किंमत ठरवावी लागेल!

टाचणी तयार करणारा कारखानदार आपल्या वस्तूची किंमत ठरवतो आणि नफ्यात राहतो. पण पृथ्वीतलावर असलेला माणूस अद्याप स्वत:ची किंमत ठरवू शकलेला नाही. येथेच गडबड होऊन त्याचा अनेक पीडित कुटुंबीयांना फटका बसत आहे. विदर्भात आणि विशेषत: नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुका हा नरभक्षी वाघांच्या चक्रव्यूहात अडकला आहे. या तालुक्यात १२ जानेवारी ते ३१ मे २०२५ या पाच महिन्यांच्या काळात सहदेव सूर्यवंशी, दशरथ धोटे आणि रवींद्र काळसर्पे या तीन शेतकऱ्यांच्या नरडीचा घोट घेत वाघाने जीव घेतला आहे. ज्या शेतकऱ्यांचा मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबीयांना वन विभागातर्फे आता प्रत्येकी २५ लाख रुपये मदतनिधी दिला जाईल. पण खरोखरच मरण पावलेल्या शेतकऱ्याची किंमत केवळ २५ लाख रुपये योग्य आहे का? यावर मंथन करणे गरजेचे झाले आहे. तीन वाघांनी या सर्व शेतकऱ्यांचा एकप्रकारे खून केला आहे. पण वाघांना आरोपी म्हणून शिक्षा करता येत नाही. अशावेळी वाघांच्या पोशिंद्यांनी मेलेल्या माणसाची योग्य किंमत तर ठरवावी. मेलेला माणूस कुणाचा तरी पती असतो, पिता असतो, मुलगा असतो. प्रत्येकाला त्याचा फार मोठा आधार असतो. तो आधारच वाघाने हिसकल्यावर त्यापोटी मिळणाऱ्या २५ लाखांनी ती भळभळणारी जखम बरी होणार काय? याचे उत्तर नाही असे द्यावे लागेल. मानवी जीवन अमूल्य आहे. महत्प्रयासानंतर मानवी जीवन प्राप्त होते. त्यातही त्याचा खून वाघाद्वारे होत असेल तर नक्कीच वन विभागाने व्यापक दृष्टिकोनातून नुकसान भरपाईची रक्कम ठरवायला हवी. केवळ २५ लाख रुपये द्यायचे आणि वन मजूर म्हणून त्याच्या वारसाला रोजंदारीवर ठेवायचे हा उपाय बकवास आहे.

माणूस समजा मेंदूमृत झाला तर त्याच्या दोन किडन्या, एक हृदय, एक फुफ्फुस, दोन डोळे, एक यकृत दुसऱ्यांच्या उपयोगी पडते. अर्थात माणूस गेल्यावर तो सात लोकांना जीवदान देतो. एवढा लाभ मानवी अवयवांचा आहे. याचे महत्त्व वैद्यकीय जगताला पटले आहे. पण निर्णय घेणाऱ्या शासनकर्त्यांना त्याचे महत्त्व पटलेले नाही. समजा पटले असते तर त्यांनी नक्कीच वाघाने मारलेल्या माणसाची किंमत केवळ २५ लाख रुपये लावलीच नसती. त्यांनी त्याच्या कुटुंबीयांना त्यापेक्षा अधिक रक्कम देत आयुष्यात नेमकी मदत कशी करावी, याचे आदर्शवत उदाहरण सादर केले असते. दुर्दैवाने ते न घडता केवळ मरण पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांची बोळवण केली जात आहे. हा प्रकारच गंभीर असल्याने आता खऱ्या अर्थाने माणसाची किंमत ठरविण्याची वेळ आलेली आहे. आज माणूस चंद्रासह मंगळावर पोहोचला. त्याने टाचणीपासून विमानापर्यंत सर्वच गोष्टींची निर्मिती करून त्यांची किंमत ठरवली. पण स्वत:ची किंमत ठरविताना तो गडबडला आहे. हीच गडबड पीडित कुटुंबीयांसाठी कर्दनकाळ ठरत आहे. म्हणूनच वाघाच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबीयांचा दूरगामी विचार करून नुकसान भरपाईची रक्कम ठरविण्याची वेळ आलेली आहे. ती रक्कम नेमकी किती, दोन कोटी, पाच कोटी रुपये की जन्मभर सन्मानजनक पेन्शन यावर तज्ज्ञांमार्फत अभ्यास होणे आजची गरज आहे. शासकीय तिजोरीतून पैसे द्यायचे असल्याने कुणाच्याही पोटात याविषयी दुखायला नको. समजा यामुळे एखाद्याचे पोट दुखणार असेल तर त्याने समोर येत तसा खुलासाही करायला हवा. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येकाला जगण्याचा अधिकार आहे. मग जे शेतकरी वाघाच्या हल्ल्यात मरण पावले, त्यांच्या मुलांनी पित्याच्या आधाराशिवाय कसे जगायचे?

ग्रामीण भागातील कुठल्याही व्यक्तीचा वाघांना विरोध नाही. पण वाघामुळे जीवाभावाचे लोक मरत असताना जनक्षोभ उसळणे अभिप्रेतच आहे. मग जनक्षोभ उसळला म्हणजे ग्रामस्थ वाघांच्या विरोधात असल्याचे चित्र शहरातील लोकांनी रंगवू नये. वाघांची संख्या शहरातील नव्हे तर ग्रामस्थांमुळे वाढली. त्यांना तर जंगलातील राजा हवा आहे. पण तो जेव्हा नरभक्षी होतो तेव्हा त्याची भीतीही वाटते. हा प्रकार पाहता नरभक्षी वाघांचा बंदोबस्त करून त्याने मारलेल्या लोकांच्या कुटुंबीयांना योग्य ती नुकसान भरपाई द्यायलाच हवी. एक कुटुंब सहजतेने जगेल एवढे व्याज दर महिन्यात मिळावे, तेवढी रक्कम शासनाने द्यावी. एकंदरीत पाहता ''अन्याये पिडा न होवो कुणास। न व्हावा मुंगीलाही त्रास। याची जाणीव असावी प्रमुखास सदासर्वकाळ ॥'' हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी सांगितलेले विचार पाहता शासनकर्त्यांनी यावर मानवीय भूमिकेतून कृती करावी, हीच नम्र विनंती. ▮

९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र

# 'समृद्धी'चे स्वप्न साकारताना

**नागेश दाचेवार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी समृद्धी महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्यातील मार्गाच्या लोकार्पणप्रसंगी, ''अंदाज कुछ अलग है मेरे सोचने का, सबको मंजिलों का शोक है और मुझे रास्ते बनाने का...'' या हिंदीतील शेरच्या माध्यमातून आपला उद्देश, हेतू स्पष्ट केला होता. खरं तर विदर्भ, मराठवाड्याचा विकास झाला पाहिजे आणि त्यासाठी कनेक्टिव्हिटीची गरज असल्याने ''नागपूर-मुंबई एक्सप्रेस वे''ची कल्पना २००० साली देवेंद्र फडणवीसांनी विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना झालेल्या अधिवेशनात विधानसभेत मांडली होती. त्यावेळी फडणवीसांनी पाहिलेलं स्वप्न हे समृद्ध महाराष्ट्राचं स्वप्न होतं.

विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राला मुंबईशी जोडणारा असा महामार्ग, जो केवळ अंतर कमी करणार नाही तर नवी स्वप्नं निर्माण करेल... असे फडणवीसांना त्यावेळी वाटले. आणि योगायोगाने महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्याचं नशीब खुलायचं होतं म्हणून की काय, २०१४ उजाडलं आणि महाराष्ट्राच्या विकासाचं स्वप्न पाहणारे देवेंद्र फडणवीस राज्याच्या मुख्यमंत्रिपदी विराजमान झाले. त्यानंतर अनेक विकास कामांसोबतच त्यांनी आपली महत्त्वांकाक्षी योजना असलेली जलयुक्त शिवार योजना आणि समृद्धी महामार्ग अशा दोन्ही योजनांची घोषणा केली. जलयुक्त शिवार योजना धडाक्यात चालविल्यानंतर अल्प कालावधीतच लोकप्रिय झाली आणि शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळू लागल्याचे चित्र महाराष्ट्रात दिसू लागले. त्यासोबतच विदर्भ आणि मराठवाड्याच्या समृद्धीचे स्वप्न असलेला समृद्धी महामार्गासाठी जागेचे अधिग्रहण सुरू झाले. तेव्हा खऱ्या अर्थाने राज्याच्या उज्ज्वल भविष्याचा, मागास राहिलेल्या राज्यातील विदर्भ आणि मराठवाड्यासारख्या भागांचा, समृद्ध महाराष्ट्राच्या वाटचालीचा पाया रचला गेला.

फडणवीसांना वाटलं महत्त्वाचं तर पाया रचणं असतं, ते कार्य मी केलंय्; आता कळस गाठायला वेळ लागणार नाही. पण फडणवीसांना कुठे माहीत होते की, त्यांच्या स्वप्नावर विरजण घालायला त्यांच्याच सोबत बसलेले दगाबाज



तयार होते म्हणून. ज्यांच्यावर या प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहणाची जबाबदारी दिली होती, तेच लोकं जमिनी देऊ नका म्हणून, विविध भागांत जाऊन शेतकऱ्यांना पेटवत होते. त्यासाठी रस्त्यावर उतरून आंदालनं करताना दिसले. एकीकडे त्यांचा मंत्री जमीन अधिग्रहण करण्याची प्रक्रिया राबवत होता आणि दुसरीकडे मंत्र्याचे मालक या महामार्गाला विरोध करत जमिनी देऊ नका म्हणून लोकांना भडकवत फिरत होते. अनेक अडथळे, अनेक विघ्नं आणण्याचे पूरेपूर प्रयत्न विरोधकांकडून आणि मांडीला मांडी लावून बसलेल्या छुप्या शत्रूरूपी मित्रांकडून झाले. मुंबईच्या जिवावर राजकारण करणाऱ्यांना उर्वरित महाराष्ट्र त्यातल्या त्यात पक्षाला थारा नसलेल्या विदर्भासारख्या भागाच्या विकासाच्या स्वप्नांची जाणीव कशी असणार? ज्यांनी २५ वर्षे एकहाती मुंबईवर राज्य केलं, ज्या मुंबईकरांनी भरभरून प्रेम दिलं, त्या मुंबईकरांच्या स्वप्नांचा चुराडा करणारे, मुंबईची दैना करणाऱ्यांना मुंबईबाहेरील भागांच्या विकासाच्या आणि तेथील जनतेच्या प्रश्नांची जाण असण्याचं काहीही एक कारण नाही. यांचा एकमेव उद्देश आपला धंदा चालला पाहिजे. मग आपली राजकीय पोळी शेकण्यासाठी महाराष्ट्राची माती झाली तरी यांना चालेल. त्यासाठी मग हे लोक कोणत्याही थराला जाण्याची तयारी ठेवतात. याचे उत्तम उदाहरण २०१९ मध्ये बघायला मिळाले.

कुठलेही वैचारिक अधिष्ठान नसताना केवळ सत्ता आणि संपत्तीच्या मोहात जुन्या मित्राच्या पाठीत खंजीर खुपसून काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसच्या मांडीवर जाऊन बसले. २०१९ ते २०२२ हा काळ महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वांत वाईट आणि दुर्दैवी काळ ठरला. या काळात महाराष्ट्रावर एका स्थगिती सम्राटाने राज्य केले. देवेंद्र फडणवीसांसोबत पूर्ण पाच वर्षे सत्ता उपभोगलेल्या या सम्राटाने आपल्याच काळात मंजूर केलेल्या अनेक महत्त्वाकांक्षी अशा मेट्रो, जलयुक्त शिवारसारख्या महत्त्वपूर्ण प्रकल्पांना स्थगिती दिली तर समृद्धी महामार्गासारख्या अनेक प्रकल्पांना रखडत ठेवले. पण म्हणतात ना ''मुद्दई लाख बुरा चाहे तो क्या होता है, वही होता है जो मंज़ूरे ख़ुदा होता है.'' एखाद्याची स्वच्छ, प्रामाणिक इच्छा असेल आणि दृढ संकल्प असेल तर मग त्याला कोणीही थांबवू शकत नाही. असेच फडणवीसांच्या बाबतीत झाले. ज्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची सुरुवात २०१५ ला फडणवीसांनी आपल्या हातून केली, तो प्रकल्प पूर्ण होऊन त्याचे लोकार्पणदेखील त्यांच्याच हस्ते झाले. यावेळी माझा महाराष्ट्र वेगाने धावणार, हे ठरवलं होतं.

हा महामार्ग केवळ रस्ता नाही, ही समृद्धीच्या दिशेनं वाटचाल आहे. हा माझा शब्द होता, आणि तो मी पाळला, माझ्या महाराष्ट्रासाठी हे स्वप्न कधीच थांबणार नाही. महाराष्ट्र आता थांबणार नाही, म्हणत महाराष्ट्राच्या, विदर्भ-मराठवाड्याच्या प्रकल्पाचे पाहिलेले स्वप्न पूर्णत्वास येताना हृदय भरून आल्याची भावना फडणवीसांनी यावेळी व्यक्त केली.

मोठा गोल साध्य करत असताना, काही गोष्टींचा त्याग करावा लागतो, मन मारावे लागते, तेव्हाच कुठलेही मोठे लक्ष्य साधता येते. फडणवीसांवर अनेक हल्ले करण्याचे प्रयत्न झाले. अडचणीत आणण्याचे, खोट्या प्रकरणांमध्ये अडकविण्याचे, कुटुंबाला, त्यांच्या सहकाऱ्यांना अडकविण्याचे असे अनेक प्रयत्न त्यावेळच्या सत्ताधाऱ्यांनी केले. पण फडणवीसांच्या प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठेमुळे सत्ताधाऱ्यांना यात यश मिळाले नाही. अनेक संकटे आणि कठीण परिस्थितींचा सामना करत कुठेही विचलित न होता, अर्जुनाप्रमाणे मासळीच्या डोळ्यावर पूर्ण लक्ष्य केंद्रित करत समृद्धी महामार्गाच्या माध्यमातून राज्याच्या, राज्यातील शेतकऱ्यांच्या समृद्धीचे लक्ष्य साधलेच. त्यासाठी त्यांचे अभिनंदन! ▮

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### आत्मनिर्भरतेच्या दिशेने वाटचाल करणारा भारत!

स्वदेशीचा नारा अगदी स्वातंत्र्यापूर्वीच्या काळापासून थोर महात्म्यांनी दिला. विदेशी वस्तू, संस्कृती आपल्याला गुलामगिरीकडे नेऊ शकतात याची जाणीव कदाचित त्यांना तेव्हाच झाली असावी. परंतु एवढ्या ७० वर्षांच्या स्वातंत्र्योत्तर काळात देखील भारताला आत्मनिर्भरतेकडे पाऊल टाकायला बराच उशीर झाला असे वाटते. परंतु 'देर आए दुरुस्त आए' या म्हणीनुसार आज संरक्षण, आरोग्य, अंतराळ, अन्नधान्य अशा प्रत्येक क्षेत्रात भारत अग्रेसर होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. परंतु देशातील लोकांनी स्वदेशी वस्तूंचा वापर करणे सुरू केले तर नक्कीच आज चौथ्या क्रमांकावर असलेली आपली अर्थव्यवस्था क्र. १ वर येत्या दशकातच पोहोचेल. एक भारतीय म्हणून, एक देशाचा जबाबदार नागरिक म्हणून, स्वदेशी वस्तू थोडीफार विदेशी वस्तूंच्या तुलनेत कमीही असेल तरी आपण सर्वांनी त्याचा वापर करूया. जेणेकरून आपला भारताचा जीडीपी वाढेल. भारताची अर्थव्यवस्था ठरविल्याप्रमाणे २०४७ पर्यंत विकसित भारताच्या दिशेने वाटचाल होईल आणि हे एक भारतीयच करू शकतो. आज ब्रह्मोस, आकाश यांसारखी क्षेपणास्त्रे युद्धामध्ये अत्युच्च कारवाई करून गेले. जेव्हा की चिनी शस्त्रे अपयशी ठरली. आतंकवादाला मदत करणाऱ्या देशांची कुठलीही वस्तू वापरणे म्हणजे आपणदेखील तेवढेच दोषी ठरू. तसेही सरकारने अशा देशांच्या वस्तूंवर बंदी बऱ्याच प्रमाणात आणली आहे. आपले आपल्या देशावर खरेच प्रेम दाखवण्याची ही वेळ आहे. जिथे शक्य आहे तिथे 'फक्त स्वदेशी वापरायचे' हा नियम जर आपण लावला तर येणाऱ्या काळात भारत १०० टक्के आत्मनिर्भर होईल.

**डॉ. भारती अनिल हेडाऊ**/यवतमाळ

●● ●●

### ग्रामीण तरुण शेतीकडे वळतील

मध्यंतरी महाराष्ट्र राज्याच्या महसूल मंत्रालयाने शेत रस्त्याचे १२ फूट रुंदीकरण धोरण जाहीर झाले. सविस्तर तपशील अजून प्रकाशित झाला नाही. या धोरणावर सर्वांगीण चर्चा आणि प्रामाणिकपणे अंमलबजावणी झाली तर याचे सकारात्मक दूरगामी परिणाम होणार आहेत. रस्ते रुंदीकरणाचे लाभ हे सर्व प्रकारच्या वाहतूक साधनांसाठी राहणार असून त्यामुळे वेळ, श्रम व इंधन बचत होणार आहे. अनेक शेतकरी, सूक्ष्म, लघु उद्योजक व व्यावसायिकांना ही योजना फायद्याची ठरणार आहे. जे रस्ते लहान आहेत ते तर रुंद होतीलच परंतु त्यांना दर २ ते ३ किलोमीटर अंतरावर दोन्ही बाजूला वळण दिले आणि पुढील रस्त्यांना जोडले तर दूरच्या शेतावर संपर्कासाठी होत असलेली शेतकऱ्याची अडचण बऱ्याच प्रमाणात कमी होऊ शकते. तसेच काहींच्या शेतामधून लहान ओढे, नाले, कालवे, लहान नद्या जात असतात. ते पार करायला सोय नसते. मोठा फेरा घ्यावा लागतो. अशांवर छोटे मजबूत पूल बांधले तर आवागमन अधिक सुलभ होऊ शकते.

अनेक शेतकऱ्यांच्या तरुण मुलांना त्यांची शेतीची कामे, पुरवठा, राखण किंवा इतर मालाची ने-आण करण्यासाठी बराच मोठा फेरा करावा लागतो. त्यामुळे अशा शेतजमिनीकडे दुर्लक्ष होऊन ती पडीक राहते. संपर्क रस्ते जाळे निर्माण झाले तर शेती उत्पादन किंवा सूक्ष्म-लघु उद्योग करणाऱ्या तरुणांसाठी खूप मोठी सोय होइल. पडीक जमिनीकडे लक्ष दिल्याने शेतमालाचे उत्पादन वाढेल आणि ज्या तरुणांना शेती, व्यवसाय, लघु उद्योग करण्याची इच्छा आहे ते देखील प्रवृत्त होतील असे वाटते. शासनाने हा विषयांवर तज्ज्ञ मंडळींकडून प्रस्ताव मागवून हा विषय गंभीरतेने घ्यावा. ग्रामीण भागातील होतकरू व कष्टकरी तरुणांकरिता ही योजना कशी फायद्याची राहील याचा विचार करून योजना आखली तर त्यांचे शहरात होणाऱ्या पलायनाला काही प्रमाणात थांबवता येईल, असे वाटते.

**संजय पाठक**/नागपूर

●● ●●

### सैन्याचे खच्चीकरण करू नका!

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिले. त्या अंतर्गत ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानातील दहशतवादी ठिकाणे नष्ट केली. तसेच पाकिस्तानने केलेल्या ड्रोन हल्ल्यांना सुद्धा भारतीय सेनेने निष्काम केले. यामध्ये पाकिस्तानचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्याचे व्हिडीओ सर्व वृत्तवाहिन्यांवरून प्रसारित झाले. पाकिस्तान अनेक दशकांपासून भारतामध्ये दहशतवादी पाठवून निष्पाप नागरिकांचे बळी घेत आहे. दहशतवादाचा भारतासह अन्य देशांना सुद्धा त्रास आहे. या पृष्ठभूमीवर भारताने दहशतवादाच्या विरोधात कठोर भूमिका घेतली. यापुढे दहशतवाद खपवून घेतला जाणार नाही, हे पाकिस्तानसह जगाला दाखवून दिले. दहशतवादचे जगातून समूळ उच्चाटन व्हावे, तसेच पाकपुरस्कृत दहशतवादाचा खरा चेहरा जगासमोर यावा, दहशतवादविरोधी या लढाईत भारताला अन्य देशांचे समर्थन मिळावे, यासाठी विदेश नीतीच्या अंतर्गत भारताने सर्वदलीय प्रतिनिधी मंडळ पहिल्यांदाच विदेश दौऱ्यावर पाठवले. मात्र विरोधी पक्ष आपली राजकीय पोळी भाजण्यात व्यस्त आहे.

पहलगाम हल्ल्याच्या प्रत्युत्तरात भारताने केलेल्या कारवाईमध्ये भारताचे किती नुकसान झाले, याची माहिती घेण्यामध्ये विरोधकांना रस आहे. अशी माहिती विचारणे म्हणजे भारतीय लष्करावर प्रश्नचिन्ह निर्माण करणे होय. आज युद्धजन्य परिस्थितीमध्ये सर्वांनी एकत्र येऊन सैन्याचे मनोबल वाढवण्याची गरज आहे. मात्र काही पक्ष आपले राजकीय डावपेच खेळत आहेत. राजकीय पक्षांनी देशहितासाठी राजकारण जरूर करावे. मात्र सैनिकांचे खच्चीकरण होईल, असे गढूळ राजकारण करू नये, असे जनतेला वाटते. कारण भारतीय लष्करप्रमुखांनी सुद्धा म्हटले आहे की, जेव्हा युद्ध होत असते, तेव्हा नुकसान दोन्ही देशांचे होते. ▮

**दत्तात्रय फोकमारे**/७४४७७९७३३५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# मोदी सरकारची यशस्वी ११ वर्षे संदर्भात भाजपची कार्यशाळा

## घरोघरी जाऊन केंद्रांच्या योजनांची माहीती व अंमलबजावणी करा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जून**

केंद्र सरकारने गोरगरीब, शेतकरी, कामगार, मागासवर्गीयांसाठी, महिलांसाठी अनेक महत्वाकांक्षी आणि लोककल्याणकारी योजना मागील ११ वर्षात राबविल्या आहेत. तसेच देशाची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर आणीत देशात प्रत्येक क्षेत्रात विकासाची कामे मोठ्या झपाट्याने होत आहेत. मेडीकल कॉलेजस, विमानतळे, रस्ते, मोठमोठे पूल उभारण्यात आले आहेत. २०१४ नंतर मोदी सरकारने देशात अमुलाग्र बदल करीत समाजातील शेवटच्या घटकांचा विकास करण्यासाठी परिश्रम घेतले आहेत. या कामांची माहीती भाजपच्या कार्यकर्त्यांनी सामान्य लोकांपर्यंत पोहोचवावी असे आवाहन मराठवाडा संयोजक किरण पाटील यांनी केले.

भारतीय जनता पक्षाच्यावतीने दि ८ जून रोजी मोदी सरकारची यशस्वी ११ वर्षे - संकल्प से सिध्दी तक या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मराठवाडा संयोजक किरण पाटील, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी आ. रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी सभापती पांडुरंग पाटील, मिलींद यंबल यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना भाजपचे जिल्हाध्यक्ष घुगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकराने देशात विकासाची गंगा आणली आहे. रस्ते, विमानतळ तसेच इतर क्षेत्रात मोठा विकास केला आहे. याशिवाय सर्वसामान्यांसाठी अनेक महत्वाकांक्षी आणि लोककल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत. या योजनांची माहीती देण्यासाठी आता प्रत्येक कार्यकर्त्याला घराघरापर्यंत जायचे आहे.

यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे म्हणाले की, केंद्र सरकार ग्रामीण भागातील लोकांसाठी घरकुल देत आहेत. परंतु याचा फायदा विरोधी पक्षातील लोक उचलत आहेत. घरकुल लाभार्थीकडून पैसे उकळत आहेत. त्यांना पंचायत समितीमध्ये नेऊन पाठपुरावा करीत आहेत. भाजपचे कार्यकर्ते कधी पंचायत समितीमध्ये जाऊन अशी चौकशी करीत आहेत काय? असा सवाल करीत योजना केंद्र शासन राबवत आहे. निधी केंद्र सरकार देत आहे आणि त्याचा फायदा विरोधक उचलत आहेत. जलजीवन मिशनच्या माध्यमातून हर घर जल, उज्ज्वला योजना, जनधन योजना, महिलांना १५०० रूपये दरमहा, शेतकऱ्यासाठी विविध योजना, शेतकरी सन्मान योजना, पाच वर्षे शेतकऱ्यांना वीज माफी, दुष्काळ निधी, पंतप्रधान पीक विमा योजना, मोफत सातबारा, अशा असंख्य योजना सरकार राबवीत आहेत. परंतु भाजपचा कार्यकर्ता या योजनांचा पाठपुरावा करीत नाही, लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी संबंधीत कार्यालयात जात नाहीत. याउलट विरोधक आणि इतर पक्षाचे कार्यकर्ते लाभार्थीकडून पैसेही वसूल करीत आहेत आणि योजनेचा लाभ त्यांनीच मिळवून दिल्याचे भासवत आहेत. भाजपच्या कार्यकर्त्यांनी याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. केवळ आमदार, खासदार आणि मंत्र्यांच्या भरवशावर न राहता स्थानिक पातळीवर काम करण्याची गरज आहे. लोकांच्या उपयोगी आपण आलो तर पक्षाची ताकद वाढेल. त्यामुळे कार्यकर्त्यानी प्रत्येक कार्यालयातील योजनांची माहीती घेवून ती लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवून ही योजना मोदी सरकार, फडणवीस सरकारची आहे हे पटवून द्यायलाच पाहीजे तरच आमचे अस्तित्व राहील. केवळ पदे घेऊन आणि हवेत गप्पा मारून जमणार नाही त्यासाठी जमिनीवर उतरून काम करावे लागेल असा सल्लाही यावेळी आ. मुटकुळे यांनी कार्यकर्त्यांना दिला.

# अंध वारकऱ्यांची दिंडी पंढरपूरकडे रवाना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जून**

हिंगोलीतील १५ अंध वारकऱ्यांची दिंडी रविवार दि ८ जून रोजी पंढरपूरकडे रवाना झाली आहे. विठ्ठल नामाच्या घोषात अंध वारकरी दररोज १० किमीचा प्रवास करीत दि ६ जूलै रोजी पंढरपूर येथे पोहोचणार आहे. प्रथमच अंध वारकऱ्यांची दिंडी पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी पायी निघाली आहे. हिंगोलीकरांनी मोठ्या उत्साहाने या दिंडीला रवाना केले आहे.

दरवर्षी लाखो भाविक आषाढी एकादशीनिमित्त वारीने पंढरपूर येथे जातात. यामध्ये वयोवृध्द नागरिकांसह बालकांचाही समावेश असतो. जय जय राम कृष्ण हरीचा गजर करीत शेकडो दिंड्यातील वारकरी पंढरपूरला पोहोचतात. त्याठिकाणी विठ्ठल रूक्मीणी मातेचे दर्शन घेऊन वारकरी परतीला लागतात.

दरम्यान, वाशिम येथील एका संस्थेचे पदाधिकारी सदानंद तावडे यांनी अंध वारकऱ्यांच्या दिंडीचा उपक्रम हाती धेतला. त्यांच्या संस्थेमध्ये अंध वारकरी उच्चशिक्षित असून अनेक ठिकाणी अभंत गायनाचे कार्यक्रम करतात. अभंग गायनामुळे या अंध वारकऱ्यांना पंढरपूरच्या वारीची ओढ लागली मात्र परिस्थितीवर कशी मात करावी असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहीला. यातून सदानंद तायडे यांनी पुढाकार घेऊन १५ अंध वारकऱ्यांची दिंडी काढण्याचा निर्णय घेतला. आपणही पंढरपूरात जाऊ शकतो असा आत्मविश्वास बाळगून हे वारकरी तारीख एक जून पासून पंढरपूरकडे निघाले आहेत. दरम्यान हिंगाली येथे आज या वारकऱ्यांचा सत्कार करून त्यांच्या नाश्ताची व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर हे वारकरी पंढरपूरकडे मार्गस्थ झाले. या संदर्भात सदानंद तायडे यांनी सांगितले की अंध वारकरी उच्चशिक्षित आहेत याशिवाय अभंग गायनाचे कार्यक्रम करतात. त्यामुळे या वारकऱ्यांनी पंढरपूरला जाण्याची इच्छा बोलून दाखवली. त्यानुसार तयारी सुरू केली आणि पाहता पाहता दानशुरांकडून मदतीचा हात मिळू लागला. दररोज १० किमीचा प्रवास कयन चारशे किमीचा प्रवास पूर्ण करून ६ जूलै रोजी पंढरपूरला पोहोचणार आहोत.

# दुचाकी चोरट्यास हिंगोली पोलिसांनी केली अटक, ३ दुचाकी जप्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जून**



शहरात दुचाकी चोरणाऱ्या एकास शहर पोलिस ठाण्याच्या डीबी पथकाने विदर्भातील वाशिम येथून शनिवारी अटक केली आहे. त्याच्याकडून तीन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली शहरातील रेल्वे स्थानक परिसरातून भूजाजी दांडेगावकर यांची दुचाकी चोरीला गेली होती. याप्रकरणी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर एका बँकेसमोररून कडती येथील बाबुराव जाधव यांचीही दुचाकी चोरीला गेली होती. याप्रकरणीही शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. शहरातील दुचाकी चोरीच्या वाढत्या घटना लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक एस के मोदे यांनी डीबी पथकातील जमादार अशोक धामणे, धनंजय क्षीरसागर, गणेश वाबळे, संतोष करे, गणेश लेकुळे, अझहर पठाण यांना जबाबदारी सोपवली. पथकाने घटनास्थळांची पाहणी केली. यावेळी वाशिम जवळ एक व्यक्ती कमी किंमतीत दुचाकी विक्री करीत असल्याची माहीती पथकाला मिळाली होती. त्यावरून पथकाने बनावट ग्राहक तयार करून वाशिम गाठले. त्याठिकाणी शिवाजी राठोड रा. डोंगर खंडाळा जि बुलढाणा ह मु वाशिम यास ताब्यात घेतले असता त्याने हिंगोलीतून दोन तर बुलढाणा जिल्ह्यातून दुचाकरी चोरल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याला अटक करून तीनही दुचाकी जप्त केल्या आहेत.



**हिंगोली- येथील नाईक नगर भागातील दिंडोरी प्रणीत स्वामी समर्थ महाराज केंद्रामध्ये बाल संस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात मोठ्या संख्येने बालकांनी सहभाग घेत शिबीर यशस्वीपणे पार पाडले- छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### श्री हनुमान पालखी नागपूरचे हिंगोलीत स्वागत



हिंगोली- ७५ वर्षापासून श्री हनुमान पालखी नागपूर ही दरवर्षी विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे रवाना होते. या पालखीचे हिंगोलीत आगमन झाल्यानंतर हिंगोलीकरांनी भव्य स्वागत करीत त्यांच्या निवासाची व भोजनाची व्यवस्था केली. यावेळी वारकऱ्यांनी भजन, किर्तने गात हिंगोलीहून पंढरपूरकडे प्रस्थान केले. या पालखीच्या स्वागतासाठी बाबा घुगे, संजय ढोके, मनोज शर्मा, राजेंद्र हलवाई, नागेश बांगर यांच्यासह भक्तांनी परिश्रम घेतले.

### शहरातील उघडे ड्रेनेज बनले धोकादायक



हिंगोली- नगर पालिकेच्यावतीने अंडर ड्रेनेज तसेच रस्त्यांची कामे शहरात करण्यात आली आहेत. परंतु शहरातील काही भागात अजूनही ड्रेनेजवर झाकण नसल्याचे दिसत आहे. तसेच या ड्रेनेजमध्ये कचराही मोठ्या प्रमाणावर साचल्यामुळे नाले तुंबण्याची शक्यता आहे. नाल्यातील घाण पाणी रस्त्यावर आल्यास आरोग्याला धोका निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. तसेच पावसाळ्यात उघड्या ड्रेनेजमध्ये पडून दुर्घटना होण्याचीही शक्यता आहे. नगर पालिकेने शहरातील उघडे ड्रेनेजची सफाई करून त्यावर झाकण टाकण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

### विवाह सोहळ्यात पाहुण्यांना दिले वृक्षांचे रोपटे

हिंगोली- वसमत येथील उषा रिसॉर्टमध्ये भोसले आणि पांडागळे पाटील परिवाराच्यावतीने विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या विवाह सोहळ्यात विवाहासाठी आलेल्या पाहुणे मंडळींना बेल, चिंच आणि जांभूळ या वृक्षांच्या रोपट्यांचे वाटप करण्यात आले. कोणताही आहेर दिला किंवा स्विकारल्या गेला नाही. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी चि सौ का उमा आणि आणि चि किरण या उच्चपदस्थ दांपत्याने समाजासमोर मोठा आदर्श ठेवला आहे. विशेष म्हणजे सातशे बेलाची, तीनशे चिंचेची आणि दोनशे जांभळीची झाडे पाहुण्यांना वाटप करण्यात आली. या विवाह सोहळ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेत कवी समाधान लोणकर यांची उत्तम कामगिरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जून**

शिवाबाबा वाघ प्रतिष्ठान आयोजित शहादू शिवाजी वाघ स्मृती राज्यस्तरीय चौथ्या काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन पांडुरंग कृपा लॉन्स येवला, नाशिक येथे करण्यात आले होते. या काव्यवाचन स्पर्धेत हिंगोलीचे कवी समाधान दिनकर लोणकर यांनी उत्तम कामगिरी करीत प्रथम क्रमांक पटकाविला.

या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी राज्यातील विविध भागातून मोठ्या संख्येने कवी, गझलकार यांची उपस्थिती होती. समाधान लोणकर यांनी त्यांच्या शैलीत बाप या कवितेने विचारमंचावरील मान्यवर व उपस्थित सर्वांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या कवितेला व सादरीकरणाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. काव्यस्पर्धेच्या अध्यक्षा डॉ. माहेश्वरी गावीत, उद्धाटक डॉ. कैलास दौंड, मृणाल गीते, लक्ष्मण बारहाते, विवेकभैय्या कोल्हे (चेअरमन), संदीप राक्षे (दिग्दर्शक), श्रीकांत बेणी, आदी मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पुस्तके भेट देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. समाधान लोणकर हे महाराष्ट्र पोलीस दलातील कर्मचारी असून जि.हिंगोली येथे कर्तव्यावर आहेत.

# महावितरण कंपनीतील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांचे स्नेहसंमेलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जून**



महावितरण कंपनीच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात अधिकारी, कर्मचारी यांच्या कुटुंबियांसह स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

महावितरण कंपनीतील अधिकारी व कर्मचारी रात्रंदिवस जीव धोक्यात घालून वीजेची कामे करीत असतात. त्यांच्यावरील ताणतणाव कमी करण्यासाठी महावितरणच्यावतीनेस्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अधिकारी, कर्मचारी त्यांच्या कुटुंबियांसह सहभागी झाले होते. या स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष आणि उद्घाटक अधीक्षक अभियंता राजेशसिंग चव्हाण तर प्रमुख पाहुणे म्हणून कार्यकारी अभियंता सुरेंद्र मुंगारे, कार्यकारी अभियंता अमोले मोरे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता अतुल पेटकर, व्यवस्थापक देविदास लांडगे रमेशकुमार सोनवणे, उपकार्यकारी अभियंता दिनकर पिसे, रणजीत देशमुख, नीरज रणवीर, आयातुल्ला खान, राजीव नंद, रोहन देसरडा यांची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्याहस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले त्यानंतर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात अधिकारी, कर्मचारी यांच्या कुटुंबियांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# औंढा येथील आयटीआयमध्ये शिवराज्यभिषेक दिनानिमित्त कार्यक्रम



**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, ८ जून**

औंढा नागनाथ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रम शुक्रवारीसाजरा करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्षस्थानी प्राचार्य जी जी पाटनुरकर, दीपप्रज्वलन डॉ. लक्ष्मणराव लोखंडे तर प्रमुख पाहुणे नगराध्यक्ष एस पी कनकुटे, उपनगराध्यक्ष ए ए देव, अँड स्वप्नील मुळे, कल्याण पोले, अनिता जाधव तर उद्घाटन दुर्गादास कुलकर्णी, प्रमुख वक्ते सुरज नांदेडकर हे होते.

प्रथमतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली.सामाजिक कार्यकर्ता सुरज नांदेडकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा शिवराज्याभिषेक दिन तर अॅड स्वप्नील मुळे यांनी कुटुंब प्रबोधन या विषयावर मनोगत व्यक्त केले.यावेळी दुर्गादास कुलकर्णी, कपिल झाडे, रूपाजी सोनुळे, श्रीनिवास देशमुख, उमाकांत सोनटक्के, शिवाजी सारोळे, रामधन बडे, खुर्शीद शेख, रवी पवार, कोमल मोरे, केशव कऱ्हाळे यांच्यासह विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच नागरिक व पालक या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना रामधन बडे, सूत्रसंचालन कपिल झाडे तर आभार रूपाजी सोनुळे यांनी मानले.

# कोवीडच्या पार्श्वभूमीवर आरोग्य यंत्रणांनी सतर्क रहावे- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जून**

कोवीडच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेने सतर्क रहावे तसेच परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी सज्ज राहण्याचे आदेश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या उपस्थितीत दि ४ जून रोजी आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी शासकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ चक्रधर मुंगल, डॉ भालेराव यांच्यासह जिल्ह्यातील उपजिल्हा रूग्णालये, ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी आरोग्य विभागाच्या कामाचा आढावा घेतला. जिल्ह्यामध्ये कोवीडच्या काळात जास्तीत जास्त किती रूग्ण होते याची माहीती घेतली. डेडीकेटेड कोवीड सेंटर, किती रूग्णांवर उपचार करण्यात आले. तसेच किती कोवीड संशयित रूग्णांची आरटीपीसीआर चाचणी घेण्यात आली. याची माहीतीही यावेळी घेण्यात आली.

हिंगोली जिल्ह्यात कोवीड रूग्णांची संख्या वाढल्यास तातडीने काय उपाययोजना करू शकतो तसेच ऑक्सिजन पुरवठा संदर्भात माहीती घेत संबंधीत ठिकाणी भेट देऊन कार्यान्वित आहे किंवा नाही याचीही माहीती यापूर्वीच जिल्हाधिकारी गुप्ता यांनी घेतली होती. कोवीड रूग्ण आढळून आल्यास आरोग्य विभागाने आवश्यक त्या खबरदारीच्या उपाययोजना हाती घेण्याच्या सुचनाही यावेळी गुप्ता यांनी दिल्या. आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी लागणारा निधी देण्याचे आश्वासन गुप्ता यांनी यावेळी दिले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# संस्कृती संवर्धन प्रतिष्ठाणच्या महिलांच्या वतीने नाथांच्या पालखी रथाला तीन किलो चांदी भेट



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०६ :- शांति ब्रम्ह संत श्री एकनाथ महाराज यांच्या पालखी सोहळ्याच्या चांदीच्या रथासाठी पैठणच्या नारीशक्तीचा पुढाकार

संस्कृती संवर्धन प्रतिष्ठानच्या माध्यमातून जवळपास तीन किलो चांदी नाथचरणी अर्पण केली आहे.

गावातील नाथ मंदिर येथे भगवान श्री विजयी पांडुरंगासमोर ब्रह्मवृंदाच्या मंत्रोच्चारात दान अर्पण करुन पालखी सोहळा प्रमुख रघुनाथ बुवा पालखीवाले व योगेश महाराज पालखीवाले यांच्या हाती सुपूर्द करण्याचा सोहळा नुकताच पार पडला.

प्रत्येक महिलेचे आपापल्या यथाशक्ती नुसार यात योगदान होते.त्यांच्या प्रत्येकीच्या हातुन संकल्प विधी होऊन आरतीने सांगता झाली . नाथांच्या वाड्यात सर्व महिलांची खण नारळाने सौ उल्का रघुनाथ बुवा पालखीवाले व सौ.माधुरी पांडव यांनी ओटी भरुन स्वागत केले.

प्रस्तावना संस्कृती प्रतिष्ठान च्या अध्यक्षा सौ रेखाताई कुलकर्णी यांनी केली.तर योगेश महाराज पालखीवाले यांनी सर्व मातृ शक्तीचे आभार मानले.

प्रतिष्ठान च्या आवाहनास सर्वांनी प्रतिसाद दिल्याबद्दल उपाध्यक्ष सौ.सुनीता पाठक यांनी सर्वांचे आभार मानले. संस्कृती संवर्धन प्रतिष्ठान च्या सर्व पदाधिकारी, सदस्य महिला या प्रसंगी उपस्थित होत्या.

दान संकल्प व पौरोहित्य अनंत गुरु खरे , रविंद्र गुरु साळजोशी ,वे.शा.स.कमलाकर गुरु शिवपुरी,दत्ता गुरु सेवनकर यांनी केले.

# उत्तमचंद ठोले जैन छात्रालयाच्या अध्यक्षपदी मनोज साहुजी तर सचिवपदी ॲड.प्रमोद पाटणी यांची निवड



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी – श्री.१००८ चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र कचनेर व्दारा संचलित श्री.उत्तमचंद जैन ठोले छात्रालय उस्मानपुरा च्या कार्यकारणी मंडळाची निवड नुकतीच करण्यात आली. हि निवड विश्वस्थ मंडळाचे अध्यक्ष सुरेश कासलीवाल, उपाध्यक्ष संजय कासलीवाल, व्यवस्थापकीय संचालक भरत ठोले, विश्वस्थ डी.यु.जैन, महेद्र काले, सुभाष बोहरा, ललीत पाटणी, प्रमोद कासलीवाल, रविंद्र खडकपुरकर, ॲड.एम. आर. बडजाते, फुलचंद इंगलवार व कार्यकारणी मंडळाचे अध्यक्ष सुनिल पाटनी व सचिव निलेश काला यांच्या मार्गदर्शनाखाली जैन छात्रालयाच्या अध्यक्ष पदी मनोज साहुजी तर सचिव पदी ॲड.प्रमोद पाटणी तर उपाध्यक्ष पदी विपीन कासलीवाल, शांतीलाल पहाडे तर सदस्य पदी विनोद लोहाडे, अशोक अजमेरा, अशोक ठोले, पंकज पांडे, मनोज बडजाते, तर स्विकृत सदस्य पदी ॲड.विवेक काला, महेद्र ठोले, वैभव काला, सुभाष चुडीवाल, नरेंद्र अजमेरा यांची निवड करण्यात आली.

सर्व प्रथम बैठकीची सुरैवात नमोकार महामंत्राने करण्यात आली. नुतन कार्यकारणीला चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर कचनेर विश्वस्थ कार्यकारणी मंडळ व छत्रपती संभाजीनगर येथील सकल जैन समाजाच्या बांधवानी शुभेच्छा दिल्या. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

# अंजीर फळपीक शेतकऱ्यांसाठी फायदेशीर

छ संभाजीनगर : अंजीर या फळपिकाची ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात मागणी असल्याने याची लागवड शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत असल्याचे मत हिमायतबाग फळ संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. संजय पाटील यांनी व्यक्त केले. कृषी विज्ञान केंद्रातर्फे, ७ रोजी आयोजित विकसित कृषी संकल्प अभियानात मौजे वानेगाव (ता. फुलंब्री) येथे डॉ. पाटील बोलत होते. यावेळी त्यांच्यासमवेत भाकृअप-पशुसंवर्धन संस्थेचे डॉ. हरिशंकर, डॉ. संघरत्न बहिरे, कृषी विज्ञान केंद्राच्या कार्यक्रम समन्वयक डॉ. दीप्ती पाटगावकर, डॉ. बसवराज पिसुरे, डॉ. मनीष कदम, कृषी विभागाचे उप विभागीय कृषी अधिकारी मकरंद नन्नावरे, प्रितेश अजमेरा आदींची उपस्थिती होती. यावेळी डॉ. पाटील म्हणाले, अंजीर या फळपिकात मोठ्या प्रमाणात आरोग्यवर्धक घटक आहेत. शरीरात रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी अंजिराचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. ग्राहक अंजिराची फळे मोठ्या प्रमाणात खरेदी करतात. अधिक उत्पादन मिळविण्यासाठी छाटणी आणि वळण देणे आवश्यक असल्याचे डॉ. पाटील म्हणाले. यावेळी अंजीर उत्पादक शेतकऱ्यांसह अन्य शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिलेसह चौघे सराईत गुन्हेगार तडीपार

सोलापूर, ८ जून : शहरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी सोलापूर शहर पोलिसांनी धडक कारवाई करत एका महिलेसह चार सराईत गुन्हेगारांना सोलापूर आणि धाराशिव या दोन जिल्ह्यांतून दोन वर्षांसाठी तडीपार केले आहे. दीपक मोहन जाधव (वय २५, रा. सेटलमेंट कॉलनी, सलगर वस्ती, सोलापूर), सचिन कलप्पा व्हनमाने (२७, रा. कल्याण नगर, जुळे सोलापूर), कपिल ज्ञानेश्वर भांडेकर (२७, रा. वडार गल्ली, बुधवार पेठ, सोलापूर), फरजाना अब्बास शेख (४२, रा. गोदुताई विडी घरकूल, सोलापूर) अशी तडीपार केलेल्यांची नावे आहेत. पोलिस आयुक्त एम. राजकुमार आणि पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांच्या नेतृत्वाखाली ही महत्त्वपूर्ण कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे गेल्या केवळ दोन दिवसांत तडीपार करण्यात आलेल्या गुन्हेगारांची संख्या सातवर पोहोचली आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यात महिला जखमी

चांदवड, ८ जून : तालुक्यातील राहुड येथील पाडगण मळा येथे घराबाहेर पोर्चमध्ये झोपलेल्या महिलेवर पहाटे तीन वाजेच्या सुमारास बिबट्याने हल्ला चढविल्याने ती गंभीर जखमी झाली. या महिलेने आरडाओरड करताच कुटूंबीयांनी धाव घेतल्याने बिबट्याने पलायन केले. सुशिलाबाई उत्तम कहांडळ (५५) हे त्या बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे.

कुटुंबातील सदस्या समवेत सदर महिला घराबाहेर पोर्चमध्ये झोपलेली असताना अचानक बिबट्याने हल्ला चढवला. अशा स्थितीत देखील महिलेने आरडाओरड केल्याने मुलासह कुटूंबीयांनी धाव घेत काठीच्या सहाय्याने बिबट्यास पिटाळून लावले. गुरुवारी रात्री बिबट्याच्या हल्ल्यात एक शेतकरी ठार झाल्याची घटना घडली असतांनाच परत बिबट्याचा दुसरा हल्ला झाल्याने तालुक्यात दहशतीचे वातावरण पसरले आहे. जखमी सुशीलाबाई यांना चांदवड उपजिल्हा रुग्णालय येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.

# धारूर न.पा.त भ्रष्टाचाराचा आरोप: प्रशासनाच्या चाव्या एकाच हाती असल्याने विकासाला खीळ?

## माधव निर्मळ यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रशासक बदलण्याची मागणी

किल्ले धारूर (प्रतिनिधी): धारूर नगरपालिकेच्या विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता आणि भ्रष्टाचार होत असल्याचा गंभीर आरोप माजलगाव मतदारसंघाचे नेते तथा माजी नगराध्यक्ष माधव निर्मळ यांनी केला आहे. मुख्याधिकारी आणि प्रशासक अशी दोन्ही पदे एकाच व्यक्तीच्या हाती असल्यामुळे हा मनमानी कारभार सुरू असून, विकासकामांना मोठा फटका बसत असल्याचे निर्मळ यांनी म्हटले आहे. धारूर नगरपालिकेच्या प्रशासकपदाची जबाबदारी उपजिल्हाधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी माननीय जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

माजी नगराध्यक्ष माधव निर्मळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, धारूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी गायकवाड यांच्यावर मनमानी कारभाराचा आरोप आहे. निविदा प्रक्रिया (टेंडर) 'मॅनेज' करणे, कामांमध्ये अनियमितता




ठेवणे, आणि शहरातील सुरू असलेल्या कामांकडे दुर्लक्ष करून केवळ स्वतःच्या फायद्यासाठी काम करणे, असे प्रकार सुरू असल्याचा दावा निर्मळ यांनी केला आहे. काम कसेही होवो, आपले हात ओले झाले की त्यातच त्यांचे समाधान दिसते, असे निर्मळ यांनी म्हटले आहे. निविदा 'मॅनेज' करून आपल्या मर्जीतील कंत्राटदारांकडून मोबदला घेतला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

धारूर शहरात झालेल्या आणि सध्या सुरू असलेल्या कामांची सखोल चौकशी झाल्यास मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार उघडकीस येईल, असा विश्वास माधव निर्मळ यांनी व्यक्त केला आहे. मुख्याधिकारी म्हणून ठाम बसलेल्या गायकवाड यांच्या कार्यकाळात झालेली अनेक कामे बोगस असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. प्रशासक आणि मुख्याधिकारी ही दोन्ही महत्त्वाची पदे एकाच व्यक्तीकडे असल्याने त्यांच्या मनमानी कारभारात वाढ झाली आहे.

या सर्व प्रकारामुळे धारूर शहरातील विकास ठप्प झाला असून, सर्वसामान्य जनतेचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे, माननीय जिल्हाधिकाऱ्यांनी या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन, धारूर नगरपालिकेच्या प्रशासकपदाचा कारभार तात्काळ उपजिल्हाधिकाऱ्यांकडे सोपवावा आणि मुख्याधिकारी गायकवाड यांचा मनमानी कारभार थांबवावा, अशी जोरदार मागणी माजी नगराध्यक्ष माधव निर्मळ यांनी केली आहे.

# कृपाळू वृद्धाश्रमास २८ हजारांचे किराणा सामान बेगमपुऱ्यातील अन्न वाचवा समितीकडून दायित्व

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : अन्न वाचवा समितीच्या अन्न वाटप अभियानाअंतर्गत रविवारी, ८ रोजी अन्न वाचवा समितीच्या वतीने बेगमपुरा भागातील कृपाळू वृद्धाश्रमास २८ हजार रुपयांचे जीवनावश्यक किराणा सामान वितरित करण्यात आले.



प्राप्त माहितीनुसार बेगमपुऱ्यातील कृपाळू हा वृद्ध लोकांसाठी असलेल्या आश्रमात २२ वृद्ध राहतात. या आश्रमाला अद्याप कोणतीही शासकीय मदत मिळत नाही. आश्रम शहरापासून दूर असल्याने त्यांना कोणत्याही सामाजिक संस्था-संघटनांकडून किंवा सामाजिक घटकांकडून कोणतीही मदत मिळत नाही. जी काय मदत मिळते, ती खुपच तुटपुंजी स्वरुपाची आहे. या आश्रमाची आर्थिक परस्थिती खूपच बेताची आहे.

पत्राद्वारे मागितली मदत

या आश्रमाच्या व्यवस्थापकांनी अन्न वाचवा समितीला पत्र लिहून मदत करण्याची विनंती केली होती. अन्न वाचवा समितीने या पत्राची गंभीर दखल घेवून शहरातील सर्व दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने आश्रमास २८,००० रुपये किमतीचे जीवनावश्यक किराणा सामान वाटप करण्यात आले.

समितीकडून दखल

समितीने व्यवस्थापकाने गंभीर दखल घेतली. यासाठी समितीच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी वृद्धाश्रमास मदत करण्याची तयारी दर्शविली. याप्रसंगी अन्न वाचवा समितीचे सभासद डॉ. सुनील देशमुख, डॉ. विजय देशमुख, ड. श्रीचंद जिग्यासी, ड. आशा शेरखाने, पूजा सोनवणे, सुधा दरबस्तवार, डॉ. सुप्रिया चिंचपुरे, रोहिणी खैरे, शिवाजी पाथ्रीकर, शिल्पा चुडीवाल, दिलीप असबे, निलेश बनसोड, देविदास खोडके, राजेश दिवटे आदी सभासद आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

महिन्याकाठी मदत अभियान

आश्रमांसाठी अशा प्रकारे जीवनावश्यक साहित्य आणि वस्तू तसेच किराणा सामान वाटप अभियान दर महिन्याला राबवण्यात येत असल्याचे अन्न वाचवा समिती चे प्रवर्तक अनंत मोताळे यांनी 'पुण्यनगरी' ला सांगितले. आश्रम चालविणाऱ्यांनी अन्न वाचवा समितीकडे पत्रव्यवहार करावा, प्रत्यक्ष संपर्क साधावा आणि मुख्य म्हणजे सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून दानशूरांनी यासाठी पुढे येवून सढळ हस्ते मदत आणि सहकार्य करण्याचे आवाहन अन्न वाचवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# बुलढाणा संस्थेच्या कन्नड शाखेच्या नवीन वास्तूमध्ये स्थलांतर

## डॉ.सुकेशजी झंवर यांची संस्थेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार सोहळा

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.८ जून

बुलढाणा अर्बन को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बुलढाणा संस्थेच्या कन्नड शाखेच्या नवीन स्वमालकीच्या सहकार किरण या वास्तूमध्ये स्थलांतर सोहळा तसेच डॉ.सुकेशजी झंवर यांची संस्थेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार सोहळा दि.७ जून शनिवार रोजी सायंकाळी ६:०० वाजता विभाग सिल्लोड अंतर्गत शाखा कन्नड येथे संपन्न झाला.स्वमालकीची नूतन वास्तू सहकार किरण या जागेचे उद्घाटन संजय शिरसाट,पालकमंत्री, छत्रपती संभाजीनगर तथा सामाजिक न्याय मंत्री,यांच्या हस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले.



त्यावेळी शाखेतील स्ट्रॉंग रूम व लॉकर्स याचे उद्घाटन संदिपान भुमरे,खासदार,छत्रपती संभाजीनगर व संजनाताई जाधव, आमदार,कन्नड-सोयगाव मतदार संघ यांच्या हस्ते करण्यात आले,

कार्यक्रमास उपस्थित मान्यवर उदयसिंगजी राजपूत, माजी आमदार कन्नड,सोयगाव,मतदार संघ,नितीन पाटील, माजी अध्यक्ष जिल्हा सहकारी बँक मर्यादित छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) विजयकुमार ठाकूरवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी,विभाग कन्नड,संतोष कोल्हे, कन्नड,मनोज राठोड,सभापती,कृषी उत्पन्न बाजार समिती कन्नड,यांच्या उपस्थितीत उद्घाटन कार्यक्रम संपन्न झाला. तसेच संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.सुकेशजी झंवर,यांची संस्थेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संजय शिरसाट पालकमंत्री,छत्रपती संभाजीनगर यांनी व संजनाताई जाधव,आमदार कन्नड सोयगाव मतदारसंघ यांनी डॉ. सुकेशजी झंवर यांचा सत्कार केला.यावेळी शाखा कन्नड येथील सर्व शाखा संचालक तसेच विभागातील सर्व शाखा संचालक खातेदार सभासद व व्यापारी वर्ग,संजय दळवी, विभागीय व्यवस्थापक सिल्लोड,प्रभाकर कोलते,विभागीय व्यवस्थापक ,विभाग जालना,शाखा रचनाकार राजकुमारजी जांगिड,छत्रपती संभाजीनगर,विभागातील सर्व शाखा व्यवस्थापक,विभागातील कर्मचारी,सोनार अल्पवचित प्रतिनिधी यांची उपस्थिती होती.

# माझी वसुंधरा अभियानाच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाचा संकल्प; जनजागृतीवर दिला जातोय भर

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.८ जून

तालुक्यातील जरंडी ग्रामपंचायतींने माझी वसुंधरा माझी जवाबदारी अभियान हाती घेऊन पर्यावरण रक्षणाचा वसा घेतला आहे.वृक्षारोपण व स्वच्छता मोहीम राबवत गावांचा चेहरामोहरा बदलला आहे.त्यामुळे या ग्रामपंचायत परिसरातील वातावरणात ओझोन वायूचे प्रमाण बऱ्याच प्रमाणात वाढले असून,गावांचे आरोग्य सुधारले आहे.याची प्रेरणा घेऊन इतर ग्रामपंचायतींनीसुद्धा या दिशेने पुढाकार घेण्याचा निर्णय घेतला आहे.ग्रामपंचायत जरंडी येथे पर्यावरण रक्षणासाठी विविध प्रकारचे उपक्रम गेल्या दोन वर्षापासून राबविले जात आहेत. वृक्षारोपणाची लोकचळवळ उभी झाली आहे.वेगवेगळ्या प्रसंगी झाडे लावली जातात.या अंतर्गत वाढदिवसाचे झाड, बाळाच्या जन्माचे झाड, स्मृतिप्रीत्यर्थ, लग्न समारंभ (लग्नात ग्रामपंचायततर्फे जोडप्याला ५ झाडे देण्याची परंपरा), गणपतीचे झाड, मनरेगा अंतर्गत शासकीय जागेवर सकल वृक्षलागवड, फळबाग



लागवड, रस्ता दुतर्फा लागवड, गावात सर्वत्र हिरवळ, पर्यावरण संवर्धनासाठी निर्माल्य, मूर्ती नदी, तलावात विसर्जन न करता इको फ्रेंडली कृत्रिम तलावात केले जाते. त्यातील निर्माल्यापासून उत्तम खतनिर्मिती केली जाते. स्मशानभूमीतील राखेचाही खत म्हणून वापर केला जातो.

गावाचे बदलतेय स्वरुप

तालुक्यातील जरंडी ग्रामपंचायतींने नुकतीच स्वच्छता अभियानात मराठवाडा विभागात बाजी मारली असून आता माझी वसुंधरा अभियान ५.० मध्ये आपला सहभाग नोंदवून ग्रामस्थांच्या प्रत्यक्ष सहभागाने वर्षभरात विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. गावातील नागरिकांनी पर्यावरण संरक्षणासाठी वर्षभरात विविध उपक्रम राबविले. ग्रामपंचायत आणि लोकसहभाग यांच्या माध्यमातून संपूर्ण गावाचा कायापालट करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल या विभागामार्फत ग्रामपंचायतीने माझी वसुंधरा अभियानाच्या माध्यमातून गावाचा कायापालट केला आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी या उपक्रमांवर भर

ग्रामस्थ आणि विद्यार्थी यांच्या प्रत्यक्ष सहभागाद्वारे गावात स्वच्छता, घनकचरा आणि ई-कचरा व्यवस्थापन, कृषी कचरा व्यवस्थापन, तृणधान्य वापरास प्रोत्साहन, वृक्षारोपण व संवर्धन, औषधी वनस्पतींची लागवड, जास्तीत जास्त सौर ऊर्जा वापर, प्लास्टिक बंदी, कापडी पिशवी वापराचे महत्त्व, आपत्ती व्यवस्थापन, पावसाचे पाणी साठवणूक प्रणाली, बांबू, शेवगा लागवडीस प्रोत्साहन, फटाकेबंदी, बायोगॅस, शोषखड्डे, बीज संकलन, गांडूळ खत प्रकल्प, सण-उत्सवांच्या वेळी होणारे जल व ध्वनिप्रदूषण कमी करणे आदी पर्यावरणपूरक उपक्रम राबविले जात आहेत.

गावात केली प्लास्टिक बंदी

या ग्रामपंचायतीला मागील दोन वर्षांत एक कोटीपेक्षा जास्त रुपयांची बक्षिसे मिळाली आहेत. गावात पूर्णपणें प्लास्टीक बंदी आहे.

सरपंच स्वाती पाटील, उपसरपंच संजय पाटील, वंदनाताई पाटील ग्रामविकास अधिकारी सुनील मंगरुळे सर्व सदस्य, विद्यार्थी, तरुण मंडळ, महिला बचत गट, ग्रामस्थ, कर्मचारी सर्वांच्या सहकार्याने प्रत्यक्ष कृती आणि जनजागृती उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यावर भर दिला जात आहे.

# मस्क यांच्याशी संबंध सुधारण्याची कोणतीही इच्छा नाही - डोनाल्ड ट्रम्प

वॉशिंगटन , ८ जून : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि टेस्लाचे मालक इलॉन मस्क यांच्यातील वाद दिवसेंदिवस वाढतानाचं दिसत आहे. मला मस्कशी संबंध सुधारण्याची कोणतीही इच्छा नाही, असं ट्रम्प यांनी शनिवारी (दि.७) स्पष्ट केले. यासोबतच त्यांनी मस्क यांना गंभीर इशाराही दिला. जर मस्क यांनी येत्या निवडणुकीत डेमोक्रॅट्सना मदत करण्याचा प्रयत्न केला तर त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असंही ट्रम्प यांनी म्हटलं.

डोनाल्ड ट्रम्प यांनी मस्क यांना आता उघडपणे इशारा दिला आहे. ट्रम्प यांनी मस्कबद्दल विचारही करत नसल्याचे म्हटले आहे. मीडियाशी बोलताना ट्रम्प यांनी मी काही काळ मस्कशी बोलणारही नाही, असं म्हटलं आहे. माझ्या मदतीशिवाय ट्रम्प यांनी निवडणूक जिंकली नसती, असं मस्क यांनी म्हटलं होतं. ट्रम्प यांच्या 'बिग ब्युटीफुल बिल' ला पैशाचा अपव्यय म्हणत इलॉन मस्क सरकारमधून बाहेर पडले होते. मस्क यांच्या टीकेवर सुरुवातीला ट्रम्प यांनी मौन बाळगलं होतं. त्यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांनी मस्क यांच्याशी समेट करण्यास नकार दिला आहे. तसेच जर मस्क यांनी कर कपात विधेयकाच्या बाजूने मतदान करणाऱ्या रिपब्लिकन उमेदवारांविरुद्ध निवडणूक लढवण्यासाठी डेमोक्रॅटिक उमेदवारांना आर्थिक मदत केली तर त्याचे अतिशय गंभीर परिणाम भोगावे लागतील असा इशारा ट्रम्प यांनी मुलाखतीमध्ये दिला. जर त्यांनी असे केले तर त्याला खूप गंभीर परिणाम भोगावे लागतील, असं ट्रम्प म्हणाले.

इलॉन मस्क यांच्यासोबतचे तुमचे संबंध संपल्याचे वाटते का असं विचारले असता, ट्रम्प यांनी, हो, मलाही तसेच वाटते, असं म्हटलं. लवकरच मस्कशी बोलण्याची माझी कोणतीही योजना नसल्याचे डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केले. 'मी इतर गोष्टींमध्ये खूप व्यस्त आहे, माझा त्यांच्याशी बोलण्याचा कोणताही हेतू नाही,' असंही ट्रम्प म्हणाले.

# प्रा. पंजाबराव मोरे यांना 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण' पुरस्कार जाहीर

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

स. भु. कला व वाणिज्य महाविद्यालयातील वाणिज्य विषयाचे प्रा. पंजाबराव मोरे यांना राज्य शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार सामाजिक क्षेत्रात कार्य करीत असलेल्या समाजसेवकांच्या मौलिक व उल्लेखनीय कार्यासाठी दिला जातो. मंगळवारी, १० जून रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात पुरस्काराचे वितरण होणार आहे.

प्रतिष्ठेच्या अशा या पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल स. भु. संस्थेचे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे, कोषाध्यक्ष मिलिंद रानडे, सहचिटणीस डॉ. रश्मी बोरीकर व प्रशासकीय अधिकारी गुलाबराव नागे यांनी प्रा. मोरे यांचा स. भु. मध्यवर्ती कार्यालयात सत्कार केला.

प्रा. मोरे हे नाटक, चित्रपट, लोककला आणि पत्रकारिता, कलापथक आदी क्षेत्रांत कार्यरत असून, त्यांनी शासनाच्या विविध योजनांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मोठे काम केले आहे. नोटबंदी, हैदराबाद मुक्तिसंग्राम आणि भारतीय राज्यघटना या विषयांवर त्यांनी पोवाडा सादर केला आहे. या पुरस्काराबद्दल प्रा. मोरे यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

# निखिल शिरसाठ याची जवाहर नवोदय विद्यालयमध्ये निवड

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : जटवाडा रोड, हर्सूल येथील आणि गोदावरी पब्लिक स्कूल मधील विद्यार्थी निखील शिवाजी शिरसाठ याची कन्नड येथील जवाहर नवोदय विद्यालयामध्ये उच्च माध्यमिक शिक्षणासाठी निवड झाली आहे. निखीलला महाराष्ट्र बोर्डाच्या दहावीच्या परीक्षेत ८७.२० टक्के गुण मिळाले असून, पुढील शिक्षणासाठी शाळेतील शिक्षकांकडून शुभेच्या देण्यात आल्या. या यशाबद्दल निखील व त्याच्या पालकाचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# सोयगाव येथे बकरी ईद उत्साहात साजरी



सोयगाव,दि.८ जून - सोयगाव येथे बकरी ईद सण उत्साहात साजरा झाला.ईद निमित्त मुस्लिम बांधवानी शहरातील ईदगाह येथे एकत्रितपणे नमाज अदा केली.सकाळी ८:०० वाजता ईदगाह येथे ईदच्या नमाजला सुरुवात झाली होती.नमाज नंतर मुस्लिम - हिन्दू बांधवांना बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या.दिवसभर सर्वत्र ईदचा उत्साह पहायला मिळाला.तर संपूर्ण शहरात सर्व धार्मिय बांधव एकमेकांना गळाभेट घेत ईदच्या शुभेच्छा देतांना दिसले. ईदगाह येथे बकरी ईद निमित्ताने शुभेच्छा देण्यासाठी सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर,सोयगाव बीट जमादार राजू बरडे,सादिक तडवी, होमगार्ड योगेश बोखारे,ऋषी काळे,कडूबा बावस्कर,विनोद इंगळे,विजय चौधरी सह सर्व सर्वधर्मीय नागरिकांची उपस्थिती होती.व उपस्थितांना बकरी ईद च्या शुभेच्छा दिल्या.

# बिडकीन विकास कामांसाठी निधी देणार - आ. संजय केणेकर



छत्रपती संभाजीनगर दि ८ : जून छत्रपती संभाजीनगर चे विधान परिषदेचे आमदार संजय केणेकर यांची पैठण तालुक्यातील बिडकीन भाजपचे मंडळ सर्कल अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण यांनी आमदार संजय केणेकर यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार करण्यात आला, तसेच येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक विषय चर्चा करण्यात आली, आमदार केनेकर यांनी भाजपा कार्यकर्त्यांना येणाऱ्या निवडणुकीत जिल्हा परिषद पंचायत समिती मध्ये आपले उमेदवार कसे निवडून येतील याकडे लक्ष देणे तसेच नागरिकांमध्ये जाऊन महाराष्ट्र सरकार व केंद्र शासनाच्या विविध योजनेची माहिती देणे , देशाचे पंतप्रधान मा नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली मोदी सरकारला अकरा वर्षं पूर्ण झाल्याबद्दल संकल्प से सिद्धी व गरीब कल्याणकारी योजना या पक्षाच्या आगामी कार्यक्रमासाठी मार्गदर्शन व चर्चा करण्यात आली व विकास कामाविषयी माहिती देणे,बिडकीन विकास कामांसाठी निधी देऊ असे केणेकर यांनी सांगितले यावेळी बिडकीन मंडळ अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण, बाप्पा शेळके, विष्णू पठाडे, भागवत ठाकूर, रंगनाथ लगाने,नासिर पठाण, सुनील गडदे, संतोष एरंडे,अजय राठोड, गणेश दाणे, साईनाथ गायके, नितीन गिधाने, धनंजय विसपुते, आदी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# धारकल्याण येथे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन!

५ तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जालना विधानसभा मतदारसंघातील मौजे धारकल्याण येथे आ .अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते १०० लक्ष च्या विकास कामांचे भूमिपूजन - घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळूचे ई-पास वाटप सदानंद महाराज मठ धारकल्याण येथे तीर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत भक्तनिवास भोजन कक्ष व विश्रांती मठ या कामासाठी विशेष प्रयत्न करून आ.खोतकर यांनी मंजुरी घेतली या विकास कामाचे आज आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या शुभहस्ते (१०० लक्ष रुपयांच्या) भूमिपूजन करण्यात आले. तसेच या कार्यक्रमामध्येच यावेळी घरकुल लाभार्थ्यांना ५ ब्रास मोफत वाळूचे ई-पास देण्यात आले.

तसेच गावातील नागरिकांना जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, जिवंत ७/१२ उतारे अशा आवश्यक कागदपत्रांचे वाटप करण्यात आले. वृक्ष लागवडीसाठी विशेष उपक्रमाची सुरुवात देखील करण्यात आली असून, एका व्यक्तीकडून एक झाड हे सूत्र स्वीकारून गावात झाडे लावण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. अधिकाऱ्यांना दिल्या स्पष्ट सूचना कार्यक्रमाच्या निमित्ताने आमदार अर्जुनराव खोतकर यांनी महसूल विभागातील मंडळ अधिकारी,



तलाठी तसेच पंचायत समितीचे अधिकारी व ग्रामसेवक यांना स्पष्ट सूचना दिल्या. त्यांनी पुढील मुद्दे अधोरेखित केले: नागरिकांना वेळेत व पारदर्शक सेवा द्या., सातबारा, उत्पन्न, जातीचे प्रमाणपत्रे वेळेवर उपलब्ध करून द्या., घरकुल, पाणी योजना, शौचालय, वृक्षलागवड योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करा., कोणताही लाभार्थी लाभापासून वंचित राहू नये., शासन निर्णय हे फाईलपुरते न राहता जमिनीवर उतरले पाहिजेत., ग्रामसेवकांनी प्रत्येक घरापर्यंत योजनांची माहिती पोहचवावी. या कार्यक्रमाला गावातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. गावातील विकासाचे नवीन पर्व सुरू झाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते,ता.प्रमुख भगवानराव अंभोरे,माजी सभापती पांडुरंग डोंगरे, वसंतराजे जाधव ,उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल,गटविकास अधिकारी संदीप पवार, तहसीलदार छाया पवार, नायब तहसीलदार राजु निहिळ,धारकल्याण चे सरपंच किशोर देशमुख , उपतालुका प्रमुख बंडू राजे ,विभाग प्रमुख गणेश भुतेकर, युवा सेना उपतालुकाप्रमुख नागेश डवले,अप्पा उगले, सुरेशराव बोरुडे पंचायत समिती सदस्य सुनील कांबळे सुरेश नाना शिरसागर विठ्ठल राव टेकाळे चेअरमन रमेशराव जाधव उद्धवराव भुतेकर, लक्ष्मण चव्हाण सदानंद उगले बळीराम घुले आप्पा-ासाहेब घोडके गणेश राहुले संतोषराव रासवे ,विजय खरात , रामचंद्र फुलझाडे,भरत उबाळे, भागवत घुले, रामेश्वर भुतेकर गणेश मस्के,रामु दराडे आदी मान्यवरासह पंचक्रोशीतील शिवसैनिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### विलास बापुचां अरविंद अण्णांनी केला सत्कार



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

दि.०७/०६/२०२५ रोजी माजी आमदार विलासराव खरात यांची महाराष्ट्र राज्य माजी आमदार समन्वयक समितीच्या छत्रपती संभाजीनगर विभागाच्या अध्यक्षपदी अध्यक्षपदी व महाराष्ट्र राज्याचे मध्ये उपाध्यक्ष पदी दिनांक ०१/०६/२०२५ पासून ५ वर्षासाठी नियुक्ती देण्यात आली आहे. या नियुक्ती बद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आले. तसेच माजी आमदार विलासराव खरात यांनी सांगितले की माजी आमदार व त्यांचे स्वीय सहाय्यक यांच्या समस्या समितीमार्फत शासनाकडे प्रश्न मांडून समस्या सोडवू असे सांगितले. यावेळी उपस्थित युवा नेते विश्वजीत खरात, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी परतुर विधानसभा अध्यक्ष भाऊसाहेब गोरे, सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पद्माकर हांडे, ज्यांना योग तालुकाध्यक्ष उमेश मोहिते, सेवा दलाचे कार्याध्यक्ष सिद्धेश्वर शिंदे,सेदलाचे उपाध्यक्ष गणेश डुकरे, युवक जिल्हा कार्याध्यक्ष किशोर सवडे, बाबासाहेब अबडकर राहुल राठोड, गणेश भुतेकर, व मोठ्या प्रमाणात पदाधिकारी ,कार्यकर्ते उपस्थित होते.

### पोटचे चार मुले व नातवाकडून वृध्द आईचा छळ, पारध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
पारध /प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील हिसोडा बू.येथील एका ८० वर्षीय वृद्धेने पारध पोलिसात तक्रार दिली की,तिची चार मुले व एक नातू यांनी माझा सांभाळ करण्या ऐवजी माझा अत-ोनात छळ चालवला आहे.या करून पारध पोलीस ठाण्यात पाच जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या विषयी सविस्तर असे की, भोकरदन तालुक्यातील हिसोडा बु.येथील वृध्द महिला कमलाबाई बाळा बावस्कर (वय ८० वर्षे)यांना पंडीत बाळा बावस्कर,भास्कर बाळा बावस्कर,अशोक बाळा बावस्कर ,दशरथ बाळा बावस्कर अशी चार मुले असून श्रीराम भास्कर बावस्कर हा नातू आहे यापैकी कोणीच कमलाबाई यांचा सांभाळ करत नाही उलट त्यांचा शारीरिक,मानसिक छळ करतात.

शनिवार दि.६ रोजी कमलाबाई यांच्या पतीची शेतजमिनी वरील पाच आरोपितानी संगनमत करून आ-पापसात वाटून घेतली.त्याच प्रमाणे कमलाबाई यांच्या वाट्यावरील ३१ गुंठ्ठे जमीन सुद्धा उपरोक्त आरोपींनी संगनमत करून परस्पर आपापसात वाटून घेतली असून सदर जमिनीत पेरणी सुरू केले आहे.त्या मोबदल्यात हे पाच आरोपी कमलबाई यांना काहीच न देता उलट मारहाण केली,लोटपोट केली व जिवेमरण्याच्या धमक्या दिल्या व सांभाळ करण्यास नकार दिला .आशा आशयाची फिर्याद कमलाबाई बाळा बावस्कर यांनी रविवार दि.७ रोजी पारध पोलीस ठाण्यात दिल्यावरून ठाणे अंमलदार सुरेंद्र खिल्लारे यांनी सदर पाचही आरोपींच्या विरोधात गुरनं १३३/२०२० कलम ११५(२), ३५१(२),(३), ३ (५), बीएनएस २०२३सह कलम २४ जेष्ठ नागरीक आणि पालक यांचे पालनपोषन आणि कल्याण अधिनियम २००७ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून घटनेचा पुढील तपास स.पो. नि.संतोष माने व पो. काँ.जाधव हे करीत आहेत.

## 'क्या हुवा तेरा वादा' जन आंदोलन संदर्भात अंबादास दानवे यांनी वलखेड गावाला दिली भेट

तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे वलखेड येथे ' क्या हुवा तेरा वादा जन आंदोलन' निमित्ताने गाव बैठक संपन्न झाली. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या प्रमुख उप-स्थितीमध्ये शेतकऱ्यांची कर्जमाफी ,१ रुपयात पीकविमा योजना बंद करण्यात आली, लाडक्या बहिणीला वाढीव रक्कम सोडाच परंतु १५०० रुपये वेळेवर मिळत नाहीत यासह परतूर पंचायत समितीत घरकुल योजनेचा लाभ पैसे दिल्या शिवाय मिळत नाही अशा अनेक सरकारच्या समस्यांचा पाढा वलखेड येथील ग्रामस्थांनी दानवे यांच्यासमोर मांडल्या. त्या बाबत गट विकास अधिकारी, कृषी अधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांना फोन करून समस्या तात्काळ सोडवण्यासाठी आदेश दिले.





याप्रसंगी शिवसेना नेते माधवराव मामा कदम, महेश नळगे, भारत पंडित, मधुकर खरात, प्रभाकर खंदारे, विठ्ठल वटाणे, शरीफ कुरेशी, दत्ता सुरुंग, मधुकर पाईकराव, गणपत खोसे, दिलीप निकम, विजय गिरी, गजानन वटाणे, दिपक काळे, श्रीहरी सुरुंग, बळीराम सोळंके, लखन डव्हारे, ऋषी बिल्लारे सह शिवसेना उबाठा गटाचे कार्यकर्ते तसेच वलखेड व परिसरातील शेतकरी बांधव उप-स्थित होते. विधानसभा निवडणुकीमध्ये महायुती सरकारने आश्वासनांचा पाऊस पाडला होता या आश्वासनांची पूर्तता अद्याप पर्यंत झालेली नाही. त्यामुळे या सरकारला त्यांनी दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देण्यासाठी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसे-नेच्या वतीने क्या हुआ तेरा वादा हे अभियान सुरू करण्यात आले आहे. याच अभियानाचा भाग म्हणून आज परतूर तालुक्यातील वलखेड येथे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बैठक घेऊन शेतकऱ्यांच्या समस्याच जाणून घेतल्या. यावेळी गावातील बहुतांश ग्रामस्थ उपस्थित होते. सरकारने दिलेल्या आश्वासनांपैकी किती आश्वासने पूर्ण झाली आणि किती बाकी आहेत? याचा आढावा दानवे यांनी घेतला व याबाबत सरकारला धारेवर धरून समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणार असा विश्वास दिला.



## प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळाव्याचे आयोजन

तभा वृत्तसेवा
बदनापूर / प्रतिनिधी

बदनापूर पंचायत समिती, बदनापूर यांच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत लाभार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन भारत सरकारचे केंद्रीय ग्रामीण विकास, कृषी व किसान कल्याण मंत्री मा.ना. श्री. शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते संपन्न झाले. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी आमदार बदनापूर-अंबड मतदारसंघाचे प्रतिनिधी मा.ना. श्री. नारायणराव कुचे साहेब होते. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हाधिकारी जालना श्री. शिरीष बन्सोडे तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. सुनीलकुमार पठारे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गटविकास अधिकारी श्रीमती ज्योती एन. राठोड यांनी केले.ह्य क्रार्यक्रमाला संरपच,ग्रामसेवक, इंजिनिअर, लाभार्थी. ही कार्यक्रम ३जून २०२५ रोजी दुपारी ४ वाजता पंचायत समिती सभागृह, बदनापूर येथे पार पडला.

## आश्वासनाची तातडीने पूर्तता करा नसता खुर्ची खाली करा -ना.अंबादास दानवे

### झोपेचं सोंग घेऊन शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडले -सांबरे



तभा वृत्तसेवा
अंबड /प्रतिनिधी

दि ७ जून अंबड तालुक्यातील ताडहदगाव येथील गावकऱ्यांशी आज शेत समस्याबाबत चर्चा करून संवाद साधला. महायुती सरकारने विधानसभा निवडणुकी दरम्यान सत्ता मिळविण्यासाठी मोठमोठ्या घोषणा केल्या. आल्यानंतर मात्र आता प्रत्यक्षात काहीच कामे शेतकऱ्यांसाठी हे सरकार करत नाही.

भारतीय जनता पक्षाने ४५ हजार गावांत पाणंद रस्ते देण्याची घोषणा आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात केली होती. पण शेतकऱ्यांना चिखल तुडवत मार्ग काढण्याशिवाय कोणताही पर्याय नाही. पाणंद रस्ते, गोठे, विहिरी यांचे गाव-ोगावचे काम सरकारच्या भ्रष्टाचारामुळे ठप्प पडले असल्याची माहिती यावेळी गावकऱ्यांना दिली.

याप्रसंगी माआमदार संतोष सांबरे, उपजिल्हाप्रमुख हनुमान धांडे, अमोल काकडे,अशोक गिरी, देविदास जराड, प्रकाश वाघमारे, विलास शिंदे, सुभाषराव वाघुंडे, परमेश्वर वाघुंडे, अशोक दिवटे व बापुराव चंद्रे प्रभू बामणे रजनीश कणके बाळासाहेब गावडे या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने शिवसैनिक व गावकरी उप-स्थित होते.

## प्रशासनाला वटणीवर आणण्यासाठी दिला आसुड

### मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांचा उपक्रम



तभा वृत्तसेवा
जालना/ प्रतिनिधी

जालन्याच्या देवमूर्ती येथे शेतकऱ्यांच्या वतीने शेतकरी योद्धा दिलीप शेठ राठी यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या धरणे आंदोलनाला मराठा महासंघाने पाठिंबा दिला आहे. जालन्यात प्रशासनाला वटणीवर आणण्यासाठी शेतकऱ्यांच्या आंदोलकाना मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी आसूड दिले आहे जालना - नांदेड समृद्धी महामार्गात गेलेल्या जमिनीला योग्य मावेजा द्या या मागणीसाठी जालना - नांदेड समृद्धी महामार्ग बाधित शेतकरी देवमूर्ती येथे धरणे आंदोलनाला बसले आहेत. देवमुर्ती येथील या धरणे आंदोलनाचा आजचा ३७ वा दिवस आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या या आंदोलनाची अद्याप शासनाकडून दखल घेण्यात आलेली नाहीये. त्यामुळे त्यामुळे मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी आसुड दिले आहे जालना - नांदेड समृद्धी महामार्ग बाधित शेतकरी आक्रमक झाले आहेत. दरम्यान, आज मराठा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी या आंदोलनाला भेट देऊन आंदोलनाला आपला पाठिंबा दर्शविला आहे. यावेळी जालना - नांदेड समृद्धी महामार्गात गेलेल्या जमिनीला सरकारने योग्य मावेजा देण्याची मागणी करण्यात आली आहे. नसता रस्त्यावर उतरू असा ईशारा देण्यात आला. यावेळी मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख मराठा महासंघाचे जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ, शेतकरी नेते बबनराव गवारे, लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष सचिन शिरसागर विशाल कोरडे पाटील, शिंदे पाटील आदींसह आंदोलक शेतकरी उपस्थित होते.

## जाफराबाद आगारातून १३ नव्या एस.टी. बस सेवा सुरु

### आमदार संतोष पाटील दानवे यांच्या हस्ते लोकार्पण

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जाफराबाद आगारातून एकूण १३ नव्या एस.टी. बससेवा आजपासून सुरु करण्यात आल्या असून त्यांचा लोकार्पण सोहळा पंचायती राज समितीचे अध्यक्ष व आमदार संतोष पाटील दानवे यांच्या हस्ते संपन्न झाला.

या लोकार्पणात मानव विकास मिशन अंतर्गत ८ नवीन बस तसेच सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थ्यांच्या प्रवासासाठी ५ लालपरी बस यांचा समावेश आहे. यावेळी



जाफराबादचे तहसीलदार, गटविकास अधिकारी, एस.टी. आगारप्रमुख, तसेच भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उप-स्थित होते. विशेषतः लोकप्रतिनिधी म्हणून फक्त रिबीन कापून थांबण्याऐवजीया आमदार दानवे यांनी औपचारिकतेपलीकडे जाऊन प्रत्यक्ष बसमध्ये प्रवास करून सामान्य प्रवाशांचा अनुभव घेतला. त्यांनी जाफराबाद ते टेंभुर्णी दरम्यान लालपरी बसने प्रवास केला. प्रवासादरम्यान त्यांनी कंडक्टरकडून तिकीटही काढले व कार्यकर्त्यांसह बसमधील प्रवाशांशी संवाद साधला. या प्रसंगाने उपस्थितांमध्ये समाधान आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. जनतेच्या सोयीसाठी नव्या बससेवा सुरू करण्याबरोबरच, एका लोकप्रतिनिधीने प्रत्यक्ष प्रवास करून आपलेपणाचा दाखला दिला, हे विश-ेषत्वाने जाणवले. नेतेपणाच्या आभाळात झेपावलेला नेता, पण पाय जमिनीवर! हे दृश्य पाहून बसमधील प्रवाशांच्या चेहऱ्यावर कौतुक, प्रेम आणि आपलेप-णाची लहर उसळली. तीन वेळा आमदार, आणि प्रथितयश नेते रावसाहेब पाटील दानवे साहेबांचे सुपुत्र असूनही सर्वसामान्यांमध्ये मिसळून हा प्रवास करणं म्हणजे राजकारणात माणुसकीचा स्पर्श काय असतो याचं जगजाहीर उदाहरण ठरलं.

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## इटलकर खून प्रकरण : न्यायासाठी १३ जूनला मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जून -**

धाराशिव शहरात शाळकरी बहिणीची छेड काढल्याच्या निषेधार्थ जाब विचारणाऱ्या मारुती इटलकर याची गुंडांनी निर्घृण हत्या केली.

या घटनेतील आरोपी अजूनही मोकाट असून, पोलिसांनी तपासात गंभीर दुर्लक्ष केल्याचा आरोप वडार एकता परिषदेने केला आहे.

या प्रकरणातील मुख्य आरोपीसह सर्व दोषींना तत्काळ अटक करावी, तसेच तपासात हलगर्जी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशा मागण्यांसाठी १३ जून रोजी इटलकर कुटुंबाच्या घरापासून धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत विराट मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती वडार एकता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष भरत विटकर यांनी दिली.

तसेच इटलकर कुटुंबाच्या पुनर्वसनासाठी २५ लाखांची आर्थिक मदत, सरकारी नोकरी, मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी व हक्काचे घर देण्याची मागणी करण्यात आली आहे.

या मागण्यांसाठी दिलेल्या निवेदनावर विविध संघटनांचे पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांच्या सह्या आहेत.



### संक्षिप्त वृत्त...



#### शिवसेनेच्या तुळजापूर तालुकाध्यक्षपदी अमोल जाधव यांची निवड

**तुळजापूर, दि.८ जून -**

शिवसेना शिंदेगटाच्या तुळजापूर तालुका अध्यक्ष पदी अमोल जाधव यांची निवड करण्यात आली असून माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते जाधव यांना निवडीचे पत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेना पक्षाच्या तालुका प्रमुखपदी अमोल जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर नियुक्तीचा कालावधी एक वर्षाचा असून हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण याचा सक्रीयपणे प्रचार आणि प्रसार करण्यासाठी तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी ही निवड करण्यात आली आहे.



#### ब्राह्मण महासंघाच्या महिला जिल्हाध्यक्षपदी स्वाती कुलकर्णी यांची निवड

**तुळजापूर, दि.८ जून -**

ब्राह्मण महासंघाच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी स्वाती कुलकर्णी यांची निवड करण्यात आली आहे. तुळजापुरात गुरुवार रोजी घेण्यात आलेल्या एका बैठकीत धाराशिव ब्राह्मण महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास शाळू यांनी धाराशिवच्या महिला जिल्हाध्यक्षा स्वाती कुलकर्णी यांना निवडीचे पत्र देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी ॲड. ओंकार कुलकर्णी, अथव पाटील, दिवाकर कुलकर्णी, अनिरुद्ध उनवणे, श्रेया कुलकर्णी आदींची उपस्थित होती.



#### लोहाऱ्यात बकरी ईद उत्साहात साजरी

**लोहारा, दि.८ जून -**

लोहारा शहरात बकरी ईद निमित्त मुस्लिम बांधवाच्यावतीने सामुदायिक ईद ऊल-अदाची नमाज अदा करुण बकरी ईद सण उत्साहात साजरा करण्यात आला. लोहारा शहरातील ईदगाह मैदानावर धर्मगुरु फज्जुसाहब कादरी यांच्या नेतृवाखाली मुस्लिम बांधवानी सामुदायिक नमाज अदा केली. यावेळी धर्मगुरु फज्जुसाहब कादरी यांनी बकरी ईद विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या नमाज नंतर शहरासह तालुक्यात हिंदु बांधवानी मुस्लिम बांधवाची गळाभेट घेऊन बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पोनि. ज्ञानेश्वर कुकलारे यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.



#### ब्राह्मण कल्याण ट्रस्टच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**धाराशिव, दि.८ जून -**

विद्यार्थ्यांना कौतूकाची थाप घेताना जवाबदारी पण पेलता आली पाहिजे. शिक्षण हे माणसाला उन्नत करते, विद्यार्थ्यांनी शिकून, समृध्द होवून देशाच्या प्रगतीला हातभार लावावा, असे प्रतिपादन खासदार मेधा कुलकर्णी यांनी केले. ब्राह्मण कल्याण ट्रस्ट, धाराशिवच्या वतीने शनिवार, ७ जून रोजी येथील परिमल मंगल कार्यालयात आयोजित गुणगौरव सोहळ्यात त्या अध्यक्षस्थानावरुन बोलत होत्या. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून माजी नगराध्यक्षा डॉ. उर्मिला गजेंद्रगडकर, जेष्ठ लेखीका निवेदिका अर्पणा कुलकर्णी यांची उपस्थिती होती. या सोहळ्यात १० वी, १२ वी मधील सुमारे ७० गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, गुलाबपुष्प, प्रमाणपत्र देवून सन्मान करण्यात आला. याच कार्यक्रमात ऋगवेद शाखा संहिता परिक्षा पास झाल्याबद्दल पुरोहित वैभव विजयकुमार घुगीकर, अनिरुध्द मुकूंद कुलकर्णी या दोघांचाही मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुजा गंधोरकर, सुत्रसंचालन डॉ. स्वप्नगंधा कुलकर्णी तर आभार अर्पणा पाठक यांनी मानले. कार्यक्रमासाठी गुणवंत विद्यार्थी, पालक तसेच शहरातील नागरीक उपस्थित होते.

# पंढरपूर-शेगाव रेल्वेमार्गास मंजुरीसाठी संसदेत आवाज उठवणार : खा. राजेनिंबाळकर

## भूम-परंडा-वाशी रेल्वे कृती समितीच्या शिष्टमंडळाने दिले खासदारांना निवेदन





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जून -**

भूम-परंडा-वाशी रेल्वे कृती समितीच्या शिष्टमंडळाने धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे खासदार ओमप्रकाश निंबाळकर यांची भेट घेऊन पंढरपूर-शेगाव या प्रस्तावित रेल्वेमार्गाच्या कामांना गती मिळावी, निधीची तातडीने तरतूद करावी व लवकरात लवकर रेल्वेसेवा सुरू व्हावी, यासाठी निवेदन सादर केले.

या मार्गामुळे खामगाव, जालना, गेवराई, वाशी, भूम, परंडा, कुडुवाडी व पंढरपूरमार्गे कोल्हापूर ही शहरे थेट रेल्वे जाळ्यात समाविष्ट होतील. त्यामुळे शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी व सामान्य प्रवाशांसाठी हा मार्ग अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

शिष्टमंडळाने खासदार ओमराजे निंबाळकर यांच्याकडे पुढील मागण्या मांडल्या आहेत. प्रस्तावित रेल्वेमार्गाच्या उर्वरित कामांना तातडीने मंजुरी मिळावी., केंद्र शासनाकडून आवश्यक निधीची त्वरित तरतूद करण्यात यावी., संसद अधिवेशनात हा विषय प्रभावीपणे मांडण्यात यावा., संबंधित लोकप्रतिनिधींची एकत्र बैठक घेऊन पुढील संयुक्त पाठपुरावा करण्यात यावा.

खासदार ओमराजे निंबाळकर यांनी या निवेदनाची गांभीर्याने दखल घेत, या विषयावर मी संसदेत ठामपणे आवाज उठवणार असून, लवकरच रेल्वे मंत्र्यांची भेट घेऊन निधी मंजुरीसाठी आवश्यक त्या सर्व पातळ्यांवर प्रयत्न करणार आहे, असे आश्वासन दिले.

## भाजपाच्या संघटनात्मक निवडीत माने व अंबर यांची तालुका मंडल अध्यक्षपदी नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ जून -**

भारतीय जनता पार्टीच्या धाराशिव जिल्हा संघटनात्मक निवडी आज भाजपाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांनी अधिकृतपणे जाहीर केल्या. यामध्ये उमरगा तालुक्यातील शिल्लक राहिलेल्या मंडल अध्यक्षांची घोषणा करण्यात आली असून, उमरगा तालुका (ग्रामीण) अध्यक्षपदी नाईचाकूर येथील सिद्धेश्वर माने तर मुरूम शहर मंडल अध्यक्षपदी निरंजनंद अंबर यांची निवड झाली आहे. यापूर्वी उमरगा शहराध्यक्षपदी एड. साईराज टाचले यांची निवड करण्यात आली होती.



सिद्धेश्वर माने यांची निवड ही संघटनात्मक, नियोजनात्मक आणि जनसंपर्काच्या बळावर पक्षाच्या विश्वासाचे प्रतीक मानली जात आहे. विद्यार्थी जीवनात अभाविप व माऊली प्रतिष्ठानमध्ये सामाजिक व धार्मिक क्षेत्रात सक्रिय राहिलेल्या माने यांनी भाजपात भाजयुमो सरचिटणीस, प्रसिद्धीप्रमुख व दोन वेळा सरचिटणीस म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. विधानसभा विस्तारक म्हणून उमरगा-लोहारा, देवास (म.प्र.) व लातूर ग्रामीण येथे त्यांच्या कामाची ठसा उमटवणारी कामगिरी पाहता, तालुका अध्यक्षपदी मिळालेली संधी ही त्यांच्या कार्याचा सन्मान मानली जात आहे.

सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये लोकप्रिय असलेले माने सर्व घटकांना सोबत घेऊन जाणारे नेतृत्व करणार, असा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये आहे.

## टेंडरपूर्वीच काम पूर्ण; नळदुर्ग न.पा.च्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ जून -**

नळदुर्ग नगरपालिकेच्या कारभारात आणखी एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ६ जून रोजी हुतात्मा निलय्या स्वामी उद्यानातील पोल शिफ्टिंग व नवीन विद्युत पोल बसविण्याच्या कामासाठी टेंडर प्रक्रिया सुरू करण्यात आली असताना, संबंधित काम आठवडाभर आधीच पूर्ण झाल्याचे समोर आले आहे. यामुळे हे काम बेकायदेशीर व नियमबाह्यपणे केल्याचा आरोप होत असून, संबंधित अधिकाऱ्यांवर चौकशी व कारवाईची मागणी होत आहे.

नगरपालिका प्रशासनावर सध्या प्रशासकाचा कारभार असून, गेल्या साडेतीन वर्षांत नागरिकांनी विकासाच्या आशा बाळगल्या होत्या. मात्र याऐवजी शहरात गरज नसलेल्या ठिकाणी कोट्यवधी रुपये खर्चून कामे केली जात असून, खऱ्या गरजांच्या ठिकाणी दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसत आहे.

विशेष म्हणजे, वीज वितरण कंपनीची परवानगी आवश्यक असलेल्या अशा जोखमीच्या कामातही नियम झुगारले गेले. जर परवानगी घेण्यात आली असेल, तर टेंडर प्रक्रिया का सुरू केली गेली? आणि परवानगी नसेल,




तर हे काम कोणी व कोणाच्या आदेशाने केले? या सर्व गोष्टींची चौकशी होणे अत्यावश्यक आहे.

काम आधी, टेंडर नंतर अशी विचित्र पद्धत स्वीकारणारी नगरपालिका राज्यात दुर्मिळ असावी, अशी टीका होत आहे. त्यामुळे धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांनी याप्रकरणी तात्काळ चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी नागरिकांची जोरदार मागणी आहे.

## व्ही.पी. शैक्षणिक संकुलात शिवराज्याभिषेक सोहळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जून -**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अभिषेक दिनानिमित्त व्ही. पी. शैक्षणिक संकुल, छत्रपती संभाजीनगर रोड, धाराशिव येथे शिवराज्याभिषेक सोहळा अत्यंत उत्साही आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. श्री साई जनविकास आयटीआयच्या वतीने तसेच डॉ. प्रतापसिंह पाटील व करण प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. प्राचार्य डॉ. सुरज ननवरे यांनी उपस्थितांना संबोधित करताना, छत्रपतींना डोक्यावर घेण्याऐवजी डोक्यात घ्या आणि त्यांचे जीवनकार्य अंगीकारा, असे प्रेरणादायी विचार मांडले. प्राचार्य अमरसिंह कवडे यांनी छत्रपतींच्या व्यवस्थापन कौशल्याचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना त्यांचे गुण आत्मसात करण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी शिवाजी महाराजांचा जीवनपट उलगडून पर्यावरणाचे महत्त्व पटवून दिले. प्रशिक्षणार्थी कार्तिक उंबरे यांनी शिवराज्याभिषेक सोहळ्याचे चित्रमय वर्णन केले.

याप्रसंगी विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. दत्तात्रय घावटे यांनी तर आभार प्रदर्शन सुमंत भोरे यांनी केले.

## तुळजाभवानी मंदिरात मास्क बंधनकारक

### कोरोना विषाणूचा धसका...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ जून -**

श्री तुळजाभवानी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी मास्क आणि सोशल डिस्टन्स बाबत नियमावली केली आहे.



महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीच्या मंदिरात महाराष्ट्र राज्यासोबतच शेजारील कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा व इतर राज्यातून भाविक मोठया प्रमाणात श्री देविजींच्या दर्शनासाठी तसेच कुलधर्म कुलाचार करणेसाठी तूळजापूर शहरात येत असतात.

सध्या कोरोना या विषाणूचा नवीन व्हेरिएन्टचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणात होत असल्याने सर्व भाविक भक्तांना तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे की, श्री तुळजाभवानी मंदिरात श्री देविजींच्या दर्शनास जात असताना भाविकांनी मास्क, सॅनिटायझर वापरावे तसेच सोशल डिस्टंन्स ठेवावे.

सर्व भाविक भक्त, पुजारी व नागरीकांना मंदिर संस्थानचे व्यवस्थापक तथा तहसीलदार अरविंद बोळंगे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे आव्हान केले आहे.

## उमरग्याच्या सागर ग्रोटेकचा स्तुत्य उपक्रम : ३५ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ जून -**

येथील महाराष्ट्र औद्योगीक परिक्षेत्रातील सागर ग्रोटेक कंपनीच्यावतीने दि.८ जुन रोजी कामगारा करीता तसेच परिसरातील जनतेकरीता रक्तदान शिबीसचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात ३५ जणा पेक्षा जास्त जणांनी रक्तदान केले.

प्रत्येक रक्तदान करणाऱ्यांस कंपनीच्यावतीने विशेष भेट वस्तू देण्यात आली. विशेष म्हणजे कंपनीचे मालक गोविंद भाई पटेल यांच्यासह संपूर्ण परीवाराने रक्तदान केले. औद्योगिक परिसरात असा स्तुत्य उपक्रम घेणारी एकमेव कंपनी आहे. जकेकुर औद्योगिक परीसरात सागर ग्रोटेक कंपनी असून यांच्यामार्फत मागील तीन वर्षांपासून सातत्याने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात येत असून, या शिबीरात स्वइच्छेने साधारण ३५ जणानी रक्तदान केले. गोविंद भाई पटेल यांच्यासह त्यांच्या गुजराती परीवाराच्या वतीने दरवर्षी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात येते.



शिबीर यशस्वीतेसाठी राकेश पटेल, विष्णू माने, सचिन दोडतले, मतीन खान, रोहीत रेड्डी, अनिस, राहील पटेल, यांनी परिश्रम घेतले.

## वृक्ष लागवड मोहीम यशस्वी करा : जिल्हाधिकारी पुजार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जून -**

या पावसाळ्यात जिल्ह्यात ५० लक्ष वृक्षांची लागवड व संगोपन मोहीम राबविण्यात येणार आहे. यामध्ये १९ जुलै रोजी एका दिवसात १५ लक्ष वृक्षांची लागवड करण्यात येणार असून, ही मोहीम गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदविण्याचा प्रयत्न राहणार आहे. या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी विविध क्षेत्रांतील व्यक्तींना विश्वासात घेऊन प्रभावी अंमलबजावणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.



**एका दिवसात होणार १५ लक्ष वृक्षांची लागवड**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित वृक्ष लागवड व संगोपन मोहिमेच्या आढावा बैठकीत पुजार बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, उपजिल्हाधिकारी प्रवीण धरमकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्याम गोडभरले, विभागीय वन अधिकारी बी.एस. पोळ, सामाजिक वनीकरण उपसंचालक करे, शिक्षणाधिकारी अशोक पाटील, सुधा साळुंके, उपविभागीय अधिकारी अरुणा गायकवाड, संजय पाटील, नगरपालिका प्रशासनाचे अजित डोके, सांख्यिकी विभागाचे उपसंचालक सुधाकर जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी पुजार म्हणाले की, वृक्ष लागवडीसाठी निवडलेल्या जमिनीची पाहणी नोडल अधिकारी व सहाय्यक नोडल अधिकारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत करावी. लागवडीसाठी लागणारे मनुष्यबळ निश्चित करून त्याची यादी तयार करावी. रोपांची वाहतूक, लागवड साहित्य, पाणी, खत आदी सर्व बाबींचे सूक्ष्म नियोजन करणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. १९ जुलै रोजीच्या वृक्ष लागवडीसाठी सकाळी ६ वाजता उपस्थिती नोंदवून, सकाळी ७ वाजतापासून लागवड सुरू करावी. गाव पातळीवर सरपंच, उपसरपंच, सेवाभावी संस्था यांना सहभागी करून ही मोहीम प्रभावीपणे राबवावी. शाळा सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर शिक्षक व विद्यार्थ्यांचा सहभाग सुनिश्चित करावा. वृक्ष लागवडीबरोबर संगोपनावरही लक्ष केंद्रित करावे, असे पुजार म्हणाले.

डॉ. घोष म्हणाले की, ग्रीन धाराशिव या मोहिमेअंतर्गत होणारी वृक्ष लागवड ही जिल्ह्यासाठी अभिमानास्पद बाब आहे. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागात व्यापक जनजागृती करावी.

या आढावा बैठकीस सर्व तहसीलदार, नगरपालिकांचे मुख्याधिकारी, तालुका कृषी अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी, तसेच संबंधित यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांनी विषमुक्त शेती केली पाहिजे : पेरके

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.८ जून -**

शेतकऱ्यांनी कमी खर्चात अधिक उत्पन्न वाढवण्यासाठी आधुनिक पद्धतीचा वापर करावा जेणे करून उत्पन्नात वाढ होईल. यासाठी बीबीएफ यंत्राने पेरणी केल्यास शेतकऱ्यांना उत्पन्न अधिक मिळू शकते त्याचबरोबर शेतकऱ्यांनी रासायनिक शेतीकडे वळण्यापेक्षा जैविक शेतीकडे वळत विष मुक्त शेती करावे, असे उदगार शासकीय कृषी विद्यालयाचे प्राचार्य डिंगबर पेरके यांनी शेती विषयक सल्ला व मार्गदर्शन शिबिराच्या वेळी ते बोलत होते.

विद्या विकास प्रतिष्ठानच्या मानव विकास केंद्राच्या वतीने शेती विषयक सल्ला व मार्गदर्शन शिबीराचे आयोजन जेवळी येथील महिला केंद्रात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.